म. ग्रं. सं. ठाणें

विषय: काव्य

लेखक: टोळेकर विष्णु रंगाजी

सन: १९०२

संग्रहालय क्रमांक: १०८६

पुस्तकाचें नांव: चंद्रेश्वर माहात्म्य

# श्री. चंद्रेश्वर माहात्म्य.

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ७०८६

# श्री चंद्रेश्वर माहात्म्य.

हा ग्रंथ



विष्णु रंगाजी शेळडेंकर
यांनीं लिहिला

तो
खानापुर येथें " धनंजय " छा० छा० प्रसिद्ध केला.
आवृत्ती पहिली.

( या पुस्तका संबंधीं सर्व हक्क कर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत. )

शके १८२४
किंमत ४ आणे.

श्री शांतादुर्गा प्रसन्न.

मत्प्रतिपालक मद्गुरु

मत्प्रियकर परमपुज्य मज्जनक [illegible]

झाली श्री चंद्रेश्वर-

यश गाया यह[illegible] [illegible]कते

[illegible] सर्वांचे मज जनक १

( [illegible]रणामृत )

जें तन ११

[illegible]हलें फळ--अल्पसाचि हा ग्रंथ

आर्पियला त्या जैसा

नवसाचा श्रीस अर्पिती ग्रंथ.(द्रव्य.)२

कर्ता.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | पंक्ती | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १० | नेतें | ने, तें |
| २ | १८ | आदितीभू | अदितिभू |
| ,, | २६ | आदितीच्या | अदितीच्या |
| ३ | १० | आवर्षण | अवर्षण |
| ७ | १ | जरि | जरी |
| ८ | १४ | स्वधू | स्ववधू |
| ९ | १५ | होऊन | होऊ, न |
| ११ | १४ | नित्यनुकरणें | रीत्यनुकरणें |
| १३ | १७ | अहित | आहेत |
| १५ | १० | तत्पुण्यलेखनीं | सत्पुण्यलेखनीं |
| १७ | १२ | हर्षें | हर्षे |
| २१ | १८ | अवलोकितो | अवलोकी, तो |
| २७ | ९ | सर्वीचें | सर्वांचें |
| २८ | ११ | आतां | आज्ञा |
| ,, | १[illegible] परिश्र | संद्बोध | सद्बोध |
| ३० | [illegible] | पापमुक्त | शापमुक्त |
| ३१ | १९ | घ्यावया | द्यावया |

या खेरीज कांहीं नजरचुका आढळल्यास त्यांची वाचकांनीं क्षमा करावी. तसेंच जे कित्येक समासघटित शब्द तोडून छापले गेले त्यांचीही माफी व्हावी.

# प्रस्तावना.

**श्री चंद्रेश्वर** पर्वत हा गोमांतकांत चंद्रवाडी महालामध्यें पारोडें या गावीं आहे. "तुर्त हा गांव सासष्टी प्रांतांत मोडतो." याला **श्री चंद्रनाथ** पर्वत असेंही ह्मणतात. फार कशाला, नुस्तें **पर्वत** हें नाम ऐकिलें कीं या पुण्यस्थलाची कल्पना ज्यांना होत नसेल असे लोक साऱ्या गोव्यांत फार थोडे सांपडतील. बेळगांव, कोल्हापुर, मुंबई इत्यादि ठिकाणींही याची प्रसिद्धी आहे.

हा पर्वत मध्यस्थळीं असल्याने गोमांतकाच्या दूर दूरच्याही प्रदेशातून सहज ओळखतां येतो. आणि विशेषें करून त्या वरील **श्री चंद्रनाथाचें** देवालय पाहणाऱ्यास पहिल्याप्रथम दिसूं लागतें. हा प्रदेश फार रमणिय आहे आणि हें **श्री चंद्रेश्वराचें** आवडतें स्थान झाल्या मुळें यास विशेष रमणियता आणि महत्व आलें आहे हें उघडच आहे.

समुद्राच्या सपाटी पासून या पर्वताची उंची सुमारें ३४८$\frac{२९}{५०}$ मेत्र ( सवादोन हातांचा एक मेत्र होतो. ) आहे. येथील हवा शुद्ध अर्थात आरोग्यकारक आहे. इच्यांत गारठा जरा ज्यास्त असतो. चैत्र वैशाखचे दिवसांत हवा पालटण्यास हें स्थान फार नामी आहे. निरनिराळ्या ऋतुंत येथील हवेंत थोडा बहुत फेरफार होत असतो. या पर्वतावर कित्येक ठिकाणीं गोड्या पाण्याचे उत्तम झरे आहेत; तींच माहात्म्यांत वर्णन केलेलीं पुण्य तीर्थें होत. यांसच **श्री गणेशतीर्थ, कपिलतीर्थ** इत्यादि नामें आहेत. अशीं तीर्थें १०८ आहेत अशी आख्याइका आहे.

हा पर्वत नाना तऱ्हेच्या औषधी वनस्पतींनीं गजबजलेला आहे. यावर लहान मोठीं झाडेंझुडपें बारमहा गच्च भरलेलीं असतात. या डोंगराची जमीन फार सुपीक आहे. येथें उत्पन्न होणारी फळफळावळ फार रुचकर असते. वाघ, रानडुकर, कुरंग इत्यादि वन्यजनावरें तसेच हरतऱ्हेचे पक्षीही जंगलांत बरेच आढळतात.

या पर्वताच्या अगदीं जवळून जी गोड्यापाण्याची नदी वाहत जाऊन समुद्रास मिळाली आहे, तिला **श्री कुशावतीगंगा** असें ह्मणतात. इचा उगम सह्याद्रि पर्वता पासून आहे. याच्या पायथ्याशीं **श्रीभैरव** देवाचें

ल्हानसें देऊळ आहे. माहात्म्यांत वर्णन केलेल्या भैरवचतुष्टयांपैकीं हा एक होय. याचें नांव **श्री शंखभैरव** असें आहे. येथें देवदर्शन करून **श्रीचंद्रनाथदर्शनेच्छु** लोक पर्वताचा घांट पटापट चढूं लागतात. अशक्तांस हा चढतांना जरा कूर्मगतीचें अवलंबन करावें लागतें. सुमारें अर्धा कोश वर चढून गेल्यावर **श्रीचंद्रेश्वर** देवाचें स्थळ लागतें याला गोमांतकी भाषेंत **थळ** असें ह्मणतात. या ठिकाणीं संस्थानच्या महाजन मंडळीचें मोठें पण जुन्या चालीचें घर आहे. यांत श्री चंद्रेश्वर देवाची प्रतिमा असते. हें घर शिखरस्थ देवालयचा प्रतिनिधीच ह्मटलें तरी चालेल. पर्वणीचे दिवस खेरीज करून नौबद वगैरे प्रत्यही याच ठिकाणीं होत असते. उत्साहार्थ आलेली महाजनमंडळी व इतर यात्रेकरूही याच ठिकाणीं राहतात. अगोदर इकडे देवदर्शन करून शिखरावर जाण्याची वहिवाट आहे. याच घरांत देवाचा निर्माल्यविसर्जक गुरव राहतो. हें घर पश्चिमाभिमुख आहे. याला पुढच्या बाजूस लहानसा द्वारमंडप आहे; त्याच्या उत्तरेकडच्या बाजूस थोड्या अंतरावर एक सर्वोत्कृष्ट पाण्याचा झरा आहे. देवडीच्या ( द्वारमंडपाच्या ) समोरल्या बाजूस जवळच लहानशी तळी आहे आणि तिच्या जवळच **श्री सिद्धभैरव** व **श्री कालभैरव** देवांचें देऊळ आहे. ( माहात्म्यांत वर्णन केलेल्या भैरवचतुष्टयांपैकीं हेही होत ) आणि त्याच्यापुढें **श्री सिद्धकुंड** आहे. यालाच **“सिद्धाची तळी”** असें ह्मणतात.

या ठिकाणीं ( स्थलांत ) देवळी लोकांचीं दहा वीस घरें आहेत. हे सर्व संस्थानचे नोकर होत या पर्वतास चार पांच टेंकड्या आहेत. त्यांत जी सर्वांत उंच टेंकडी आहे तिजवर **श्री चंद्रनाथ** देवाचें देवालय आहे. ह्या टेकडीच्या दक्षिणेकडील खोऱ्यांत काय तें ब्राह्मणाचें एकच घर आहे. ह्या ठिकाणास **गवगाळ** असें ह्मणतात.

श्री **सिद्धभैरवाच्या** देवळाजवळून शिखरावर जाण्याच्या घाटांस सुरवात होते. तो चढून गेल्यावर प्राकाराचा दरवाजा लागतो; त्यांत प्रवेश केला ह्मणजे, अपार सृष्टिसौंदर्यदर्शक **श्री चंद्रनाथ** पर्वताच्या अगदीं शिखरावर पोंहोंचलों. अहाहा ! ! तो शीतल वायू, जणू आपल्या सत्कारार्थ सामोरा येत आहे कीं काय असें वाटतें. त्याच्या त्या शीतल स्पर्शानें— नव्हे त्या सुखावह सत्कारानें शारिरीकच कशाला,

मानसीक श्रम सुद्धां पर्वताची उतरण धरूं लागतात. या रमणिय प्राकारांत **श्री चंद्रेश्वराचें** सुंदर देवालय आहे त्याच्या अगदीं नजीकच पण जरा डाव्या बाजूस **श्री भूतनाथ** देवाचें लहानसें देऊळ आहे. ( माहात्म्यांत वर्णन केलेल्या भैरवांतील पुढारी हाच होय. ) तसाच एक पिंपळाचा वृक्ष व एक दीपस्तंभ आहे.

**श्री चंद्रेश्वराचें** देऊळ बांधून झाल्यास सुमारें १०५ वर वर्षे होऊन गेलीं. आणि श्री **भूतनाथा**च्या देवालयास ६५ वर झालीं आहेत.

**श्री चंद्रेश्वराचें** देवालय फार मोठें नाहीं आणि अगदीं लहानही पण नाहीं. यांत पुराण कीर्तनश्रवणास शें दोनसें मंडळी व्यवस्थेनें बसूं शकते. गाभारा जरा लहान आहे कारण तो श्री **चंद्रेश्वरलिंगाच्या** पार्श्वभागीं असलेल्या प्रचंड शिलेनें बहुतेक व्याप्त आहे.

देवदर्शन करून देवळाच्या आजूबाजूस जरा हिंडून पाहिलें ह्मणजे, जो सृष्टिसौंदर्याचा अति रमणिय देखावा दृष्टीस पडतो; त्यानें तर आपण आनंद शिखरावर समाधान मंदिरांत आहोंत असें वाटल्यास नवल तें काय ?

या संस्थानचें बरेंच उत्पन्न आहे. चंद्रवाडींतील **आमोणें** हा देवाचा इनाम गांव आहे. तसेंच चंद्रवाडींतील कित्येक गांवांतूनही इनामें सुटलेलीं आहेत. शिवाय महालांतूनही बरेंच वर्षासन दरसाल या संस्थानास मिळत असतें. **श्री चंद्रनाथ** पर्वत तर त्याच देवाचा आहे. संस्थानचें उत्पन्न व **देवाच्या** पूजोत्साहादि नित्य नैमित्तिक कृत्यांचा खर्च हीं जवळ जवळ आहेत. या संस्थानांत बारमाह उत्साह होत असतात. प्रति सोमवारी शिबिकोत्साह तसेंच चैत्र पौर्णिमा, श्रावण सोमवार, नवरात्र, कार्तिक पौर्णिमा, शिवरात्र इत्यादि उत्साह होतात. चैत्रपौर्णिमेस हजारों यात्रा भरत असते त्या दिवशीं रथोत्साह पाहण्या सारखा होतो.

या पुण्यक्षेत्राच्या उत्पत्ती विषयीं स्कंदपुराणांतर्गत **श्री चंद्रेश्वरमाहात्म्यांत** वर्णन आहे. त्यावर वे।। रा० **गणेश विठ्ठलभट्ट** जोशी मु० आमोणें यांनीं केलेल्या ओवीबद्धटिकेच्या आधारें या वेड्यावांकड्या आर्यो लिहून त्या सुरस काव्यांच्या रसज्ञ वाचकांपुढें आणण्याचें धाडस केलें आहे. तरी ही गरिबाची अल्प सेवा मान्य करून घेणें उदार मनाच्या वाचकांवर अवलंबून आहे. हा कर्त्याचा पहिला प्रयत्न याकडे लक्ष देऊन ते यांतील दोषांची क्षमा करितील अशी आशा बाळगितों.

या कामीं ज्यांनीं आगाऊ सह्या देऊन आपला उदार आश्रय व्यक्त केला, व त्या मिळविण्याविषयीं ज्या आमच्या प्रियमित्रांनीं परिश्रम केले त्यांचे ही फार फार आभारी आहों. कारण त्यांच्या उदार आश्रयाचें व परिश्रमाचें फळ,—या पुस्तकाची प्रसिद्धी होय. त्याचप्रमाणें ज्या कित्येक हितचिंतकांनीं आपला अमोल वेळ या पुस्तकाच्या वाचनांत खर्चून वेळीं योग्य सूचना केल्या, त्यांचे आह्मी फार ऋणी आहों. तसेच अल्प मुदतींत आणि सोयीवार काम करून देण्याचे जे **धनंजय** छापखान्याच्या मालकांनीं श्रम घेतले त्याबद्दल त्यांचेही आभार मानल्यावांचून राहवत नाहीं.

शेवटीं ज्या जगन्नियंत्या परमेश्वराच्या कृपेनें हा अल्प प्रयत्न सिद्धीस गेला; त्या परमदयाळू श्री चंद्रेश्वराच्या पदकमलांस अनन्यभावें प्रणिपात करून हा लेख पुरा करतों.

गोंवा–असोळडें.
शके १८२४ शुभकृत स. चैत्र शु० १ दा. } **विष्णु रंगाजी शेळडेकर.**

# श्री चंद्रेश्वर महात्म्य.



## अध्याय १ ला.

वंदुनि श्रीगजवदना भावें श्रीशारदा पदीं नमन ।
कवनारंभीं करितों चंचलता मुक्त व्हावयास मन ॥ १ ॥
ज्यांसम दैवत न दुजें उपकृतिलाही नसे कधीं गणती ।
त्या माता-पितरांच्या चरणीं माझी सदां असो प्रणती ॥ २ ॥
दुष्कर कामीं देतो श्री गुरुचा कीं प्रसाद धैर्य, पद ।
विसरेन कसे त्यांचे नमितां जे आधिला[1] न देति पदें[2] ॥ ३ ॥
श्री जगदंबा शांता-दुर्गा कुलदेवता मनोभावें ।
नमितों जिच्या प्रसादें अज्ञा सुज्ञान आशु[3] लाभावें ॥ ४ ॥
चंद्रेश जगच्चालक भवभयहर तव सुनाम दीनांस ।
सदनास तुझ्या नेतें येवो या सतत मूढ वदनास ॥ ५ ॥

---

१ मनोव्यथेला. २ स्थान. ३ त्वरित.

स्वत्कीर्ति सागरांना न अनंतहि पावला शिरीं धरिता।
सागर वसना, तरि मी अल्प कसा सेवुनी करीन रिता ॥ ६ ॥
परि शक्त्यनुसार स्तुति करिन उडे शलभ अंबरीं जेवी।
निर्मल विपुल सलिल¹ तानेला क्षुद्र जंतुही सेवी ॥ ७ ॥
अल्पहि चरित श्रवणें तोष सदां होय अंतरीं बहुत।
नाशी पाप सकलही स्वल्पाऽनल करि जसा अरण्य हुत ॥ ८ ॥
स्कंद पुराणीं ज्याचें वर्णन तें मी कथीन अल्पमती।
दोषक्षमेस सकरुण-कविजन हृन्मंदिरीं नसे कमती ॥ ९ ॥
भवदरहर² हरकीर्ति-श्रवणोत्सुक ऋषिचकोर अमृतकरा।
स्कंदा सविनय ह्मणती श्रीचंद्रेश्वर चरित्र कथन करा ॥ १० ॥
सांगूं लागे शिवसुत परिसे मुनिसंघ सावधान मनें।
श्रीचंद्रेश चरित तें करिती ज्या साधुजन सदा नमनें ॥ ११ ॥
मुनिगणवेष्टित शिवसुत वदतां तें रम्य चरित बहु हर्षें।
गमला भगणांत³ शशी वा चातक मुनि सुमेघ गुह वर्षे ॥ १२ ॥
श्री हाटकपुर* दक्षिण-भागीं श्री सांब ज्या नगीं राहे।
बुध त्या चंद्रेश्वरगिरि ह्मणती, हें स्थान धन्य जो पाहे ॥ १३ ॥
या सुक्षेत्रीं सेविति भक्तिरसातें अनेक भूदेव।
भूपतिहि बहु प्रेमें नाकीं⁴ रस जेविं आदितीभू⁵ देव ॥ १४ ॥
ज्याच्या सन्मुख वाहे श्रीमद्गंगा कुशावती, नीरा-।

---

* ह्यास हल्लीं "नारवें" ह्मणतात. हा गांव बत्तग्राम प्रांतांत आहे. श्री हाटकेश्वराचें हें स्थान झाल्या कारणानें ह्या गांवास "हाटकपुर" हें नांव पडलें. सह्याद्रिखंडांत असें वर्णन आहे कीः—

"गोवापुरोत्तरेभागे हाटकाख्यपुरं महत्।
तस्याधिपः शिवः साक्षात् गौरीशश्चंद्रशेखरः ॥ १ ॥

१ नदीचें पाणी. २ संसारभय हरण करणारें श्री सांबाचें माहात्म्य. ३ नक्षत्र-समुदायांत. ४ स्वर्गीं. ५ आदितीच्या पोटीं झालेले.

उपमा नसेचि ईच्या लाजवि जें कामधेनुच्या क्षीरा ॥ १५ ॥
जीच्या विस्तृत तीरीं विप्रर्षीश्वर[1] कुलें सुखें वसती ।
पाहुनि लज्जित व्हावी मनुजोत्कर्षा[2]ऽसहिष्णु सुरवसती[3] ॥ १६ ॥
स्वर्गीं कल्पनगाश्रित त्रिदशचि सुख भोगिती यथेच्छ सदा ।
या श्रीचंद्रेशनगीं कल्पनगई[4] लाभ सुरनरादि[5] सदा ॥ १७ ॥
अमृतरसाच्या पानें आणुनि सुर निज वपूसि बहु पुष्टी ।
अप्सरसांच्या सदनीं श्रृंगारें करिति ते मनस्तुष्टी ॥ १८ ॥
हें मुख्य सौख्य आहे अमरपुरीमाजि ह्मणुनियां वाटे ।
भयाभित महेंद्र वर्ते नाकीं, भय दुःख या स्थलीं आटे ॥ १९ ॥
पडतांहि आकर्षण जी न चुके अपावया जना तोय ।
कलिमलहरणा गंगा पूज्य जनांला कशी न ती होय ॥ २० ॥
याचक मन तर्पाया साम्य जिचें नच वरील कल्पलता ।
झिजवी काय जिवांच्या काजीं ही वर्णनीय वत्सलता ॥ २१ ॥
तात इचा धन्य खरा सह्याद्रि प्रसवुनी अशी कन्या ।
पाहुनि उगा वसे या हिमनग जो निज सुता ह्मणे धन्या ॥ २२ ॥
ऐशा स्वगुणीं झाली जी गंगा सर्व तापसां मान्य ।
ताता अशा सुतेचा विरह करिल काय ताप सामान्य ॥ २३ ॥
भक्तोद्धरणाकारितां करि धारण जी सुजन्म बापाला ।
त्यागुनि हरावया जणुं जाय श्री हाटकेश* तापाला ॥ २४ ॥

---

१ ब्राह्मण, ऋषि यांचे समुदाय. २ मनुष्यांचा उत्कर्ष सहन न होणारा. ३ देवांचें वास्तव्य स्थान ( स्वर्ग ) ४ कल्पवृक्ष देणाराचा प्राप्ति ( श्री सांबाचा लाभ ) ५ देव, मनुष्य इत्यादिकांचा समुदाय.

* श्री हाटकेश देवाचें स्थान नदींत आहे, या देवाच्या पूजेचें निर्माल्य श्रावण महिन्यांत नदींतून वर येत असे असें बहुतेक वृद्ध लोक सांगतात. स्कंदपुराणांतही असें आहे कीं:-

" हाटकेशःपंचवक्त्रो लोकपालैश्च पूजितः ।

जातां अमित जनांला देउनियां सौख्य पाप ताप हरी ।
जाणो जनाऽघकरिगण[1] पळला पाहोनि तत्प्रभाव हरी ॥ २५ ॥
श्री हाटकेश दर्शन घ्याया झाली उतावेिळ अहा ती ।
काय गती वर्णावी जवनें[2] पवन ही न होय तिजपुढती ॥ २६ ॥
प्राशी आचमनें जो सागर राहुनि *तदाश्रमीं क्षणती ।
श्रीमत्कुशावती करि न्हायास मुनि प्रसन्न तो म्हणती ॥ २७ ॥
तेज जयाचें दांपी[3] यादां[4], आंशी[5] मुनिंद्र दे तीतें ।
स्वोघाऽऽवरणें[6] झाली स्थिर ऐशा त्या सुमान देतीतें ॥ २८ ॥
न्हाया पात्र सुगतिला कीर्ति जिची साधु सर्वदा गाती ।
ओघाऽऽवरणा[7] करितां तुंबुनि जल जाहली ×दुभंगा ती ॥ २९ ॥
करुनी प्रदक्षिणा श्री-मुनिच्या पुण्याश्रमा निघे जाया ।
श्री हाटकेश दर्शन-सुत्सुक भावी महाब्धिची जाया ॥ ३० ॥
गतिरोधक उंचवटे टाळुनि चाले द्विधा तदीय सरी ।
वाटे प्रियकर पतिला आलिंगायास बाहु ते पसरी ॥ ३१ ॥

---

हरिसंकर्षणाख्यंच नित्यं पूजयते स्वयं ॥ १ ॥
अद्यापि दृश्यते विप्रा श्रावणे मासिचाद्भुतं ।
निर्माल्याणिच पत्राणि बिल्वानि कुसुमान्यपि ॥ २ ॥
नदी पंचकसंयोगात् महाक्षेत्र महोदधे ।
द्वीपस्य परितो गंगा ब्रह्महत्याघनाशनी ॥ ३ ॥

* अंत्रूज महालांत, " आगापुर " ह्मणून कवळें गांवचा एक वाडा आहे, त्यास " अगस्तिपुर " असें ह्मणतात. तेथें हा आश्रम असावा.

× आगापुरा पासून कांहीं पुढें ( मडकईकडे ) या नदीचे दोन भाग झालेले आहेत.

१ जनाचीं पातकें हाच हत्तींचा समूह. २ वेगवान. ३ भिषवी. ४ जलचरांस. ५ आशिर्वाद. ६ आपला ओघ आटोपून धरल्यामुळें. ७ प्रवाह.

भाग तियेचा *पहिला गेला त्या प्रियकरास भेटाया ।
दुसरा त्वरित गतीनें जाय श्री हाटकेश्वरा ठाया ॥ ३२ ॥
सतिला पति ईश्वर सम ह्मणुनी आलिंगिला स्वपतिकाय ।
एक्या हस्तें, कवळी दुसऱ्या श्री हाटकेश पद काय ॥ ३३ ॥
कीं कवणा वंदावें पूर्वी श्री हाटकेश पद अथवा ।
पतिचरणा, हें नेणुनि केला सेवाप्रकार काय नवा ॥ ३४ ॥
सर्वार्थ साधनप्रद मनुजां ज्याचें सदैवही तोय ।
श्रीहाटकेश दर्शन घडतां तो + ऐक्य सिंधुसीं होय ॥ ३५ ॥
श्री हाटकेश दर्शन घडतां ती ×होय पंचगंगा हो ।
जन ह्मणती त्या सुखकर तीर्थाचा स्पर्श नित्य स्वांऽगा हो ॥३६॥
अमित जिवां त्रास करी जें टिकलें काहिं काल पर्यंत ।
पृथ्वीवरी अवर्षण झाला मुनि ह्मणति पुण्यगिर्यंत[1] ॥ ३७ ॥
ते ह्मणति बंद पडलीं कर्मै कीं आमुचीं अहा जाय ।
जप तप विलया, उत्तम होतें, असु सोडिते जरी काय ॥ ३८ ॥
किंबहुना न मिळे जळ तृषितां मग याज्ञिकांस कैंचें हो ।
किति जन तृषार्त ह्मणती मृत्युहि यो[2] परि कदा न ऐसें हो ॥३९॥
क्षुत्तृड्व्याकुल[3] झाले जन त्यांची ती अवर्णनीय दशा ।
काय वदों जी श्रवणें स्थिति दे क्लेशद मनासि मोदवशा[4] ॥४०॥

---

* हा भाग, कुट्टाळ ( कुशस्थली ) व आगशी ( अघनाशनी ) या गांवा मधून जाऊन मुर्गावास समुद्राला मिळाला आहे.

\+ हा आग्वादकडे समुद्रास मिळाला आहे.

× हिला चोहींकडून आणखी चार नद्या मिळाल्या मुळें तिला पंच-गंगा हें नाम पडलें आहे. मागील २९ आर्येच्या टिपेंतील तिसरा श्लोक पहावा.

१ पुण्यपर्वताचा अंत. २ येवो. ३ क्षुधा, तृषा यांहीं व्याकुल. ४ आनंदास वश झालेलें.

करितां शोध कितीकां लाभे श्रीमत्कुशावती तोय ।
झाले अत्यानंदित वाटे त्यां अमृत लाभली होय ॥ ४१॥
तीरीं कुशावतीच्या करिती ते द्विज तदा सुखें वसती ।
यज्ञादि नित्यकर्मे होतां लाजेल कां न सुरवसती ॥ ४२ ॥
मिळलें जीवन परि त्यां पोटाला नाहिं खावया कांहीं ।
क्षुद्व्याकुल तैं प्रार्थिति शंकर, घन मोर जेवि केकाहीं ॥ ४३ ॥
भो जगदीश्वर शिव हर परमेश्वर सुरगुरो दयासिंधो ।
रक्षीं भक्षी लक्षीं घोरसमय अहि अनाथजनबंधो ॥ ४४ ॥
देवा विव्हळ झालों अशनाविण विकळ जाहले प्राण ।
लवही नाहीं उरलें गेलें कीं सर्व आमुचें त्राण ॥ ४५ ॥
जाचितसे ही कुदशा द्या अशना वा करा त्वरित मुक्त ।
कुदशेंत वांचण्याहुनि गमतें आम्हास मरणची युक्त[१] ॥ ४६ ॥
वाटे मृत्यु वरा कीं त्याचें तें दुःख एकदांच घडे ।
दुःसह विपत्तिचें या एकावरि एक नित्य नव्य[२] जडे ॥ ४७ ॥
बघतां अंत असा कां क्षुद्बाधा ही असह्य वारा हो ।
अस्मद्विपत्तिपटला[३] जगदीशा तव सुकीर्ति वारा हो ॥ ४८ ॥
कैलासाहुनि आला धांवत करुणार्द्रहृदय शंकर हो ।
कीं कुदशाहारक निज-दर्शन मुनिहृच्चकोर[४] हिमकर हो ॥ ४९ ॥
हालाहलाहुनिहि ज्या निजजनकुदशा सुदुःसहा वाटे ।
धावनकष्टें प्रभुच्या आलें जल रोमरंध्रिंच्या वाटे ॥ ५० ॥
मुनिजनदीनदशेतें पाहुनि जगदीश फार गहिंवरुनी ।
दे धीर अब्दशब्दें[५] तव्हां गिरिची प्रचंड तनु वरुनी ॥ ५१ ॥
शिवतनुधरी अचलता पावे तद्रोमरंध्र निर्झरता ।

---

१ योग्य ( बरें ) २ नवें. ३ आमच्या विपत्तिरूप अभ्राला. ४ मुनिजन रूप चकोरांचा इ. ५ मेघा सारख्या गंभीर शब्दानें.

धर्महि जरि अमृतता कां न वरिल मुनि समूह निर्जरता ॥ ५२ ॥
शोभति नगं नग ज्यावरः वसनासम नीलवर्ण ही कुंज ।
ऐसा सुरम्य शिवनग घनपटलांचा जणू गर्भ पुंज ॥ ५३ ॥
पावे मुनिंच्या स्तोत्रें करुणार्णव जणु दयाब्द रूपातें ।
रवहि घनाचा मग नच वाटावें नवल कां अमरपा तें ॥ ५४ ॥
निजदेहजन्य अमृता सेवाया त्या रवेंचि आज्ञापी ।
ऋषिकर्ण तृषित चातक-गण मेघामृतचि शंकराज्ञा पी ॥ ५५ ॥
ऐशा अपूर्वलाभें कुदशावश मुदित तृप्त मन झालें ।
वाटे अंधा झाले प्राप्त नयन ऐकुनी बधिर धाले ॥ ५६ ॥
संचय रत्नांचा त्या गिरिच्या पोटीं असे असंख्यात ।
गुरुतर विधुकांतशिला ज्याच्या शिखरावरी असे ख्यात ॥ ५७ ॥
ज्याचें दर्शन करितें पतितां भवसागरांतुनी मुक्त ।
शोभे चंद्रेश्वर हें नाम तया श्रेष्ट पर्वता युक्त ॥ ५८ ॥

---

# अध्याय २ रा.

ज्याच्या कीर्तिश्रवणें मिळते पतितांसही सदा सुगती ।
तो हा श्री जगदीश्वर अवतरला भक्ततारणा जगतीं ॥ १ ॥
नीरवितरणें रक्षण करुनि मुनींला ह्मणे सदाशिवहो ।
कळवा इच्छा तुमची प्राप्त तुह्मां मद्वरें सदा शिव हो ॥ २ ॥
तिव्र तपं दुर्लभ जो ह्मणतो वांच्छित असेल तें मागा ।
जरि वत्सलता ऐसी मातातातीं असेल तरि सांगा ॥ ३ ॥

---

१ वृक्ष हेच अलंकार. २ अमरपती जो इंद्र त्याला. ३ प्रचंड. ४ चंद्रकांत शिला. उदकदानामें.

ऐशा शर्वोक्तीच्या श्रवणें हरिखुनि मुनींद्र तैं ह्मणती ।
व्हावास तूंचि आह्मां सद्भावें करुनि तत्पदां प्रणती ॥ ४ ॥
भावें तव भजनाला लागे तो शमन दृष्टिला चुकवी ।
पळवी कामादिक रिपु ह्मणउनि घे सर्वतोमुखें सुकवी ॥ ५ ॥
जीवोद्धरणाकरितां झिजवी वपु माय पंचगंगा ती ।
तीर्थ स्पर्श तिचा हरि अघबाधा, कीर्ति जन अशी गाती ॥ ६ ॥
तव अंगोद्भव निर्झर अढळ सदा जे सुकीर्तिचेच निधी[1] ।
यज्जल वंदन जीवां हृष्ट करी जेवि लुब्धकास निधी[2] ॥ ७ ॥
साक्षात् तुजपासुनि ती प्राप्त जनां जाहली असे गंगा ।
स्पर्श तिचा पतितांच्या घडतां करि पात्र तव पदा अंगा ॥ ८ ॥
यावच्चंद्र दिवाकर स्थिरता पावा तुह्मीं महीवर हो ।
भो जगदीश सदा तव करुणेक्षण[3] दीन पीडितांवर हो ॥ ९ ॥
भक्तेच्छित पुरवाया हरदुःसह विरहदाह सहन करी ।
कोण असे सांबाहुनि जो स्वधू विरहेंदुःख[4] सहन करी ॥ १० ॥
अति दुःखद भवगुणवश[5] मुक्तकराया स्वभक्तजन सर्व ।
राहे स्वयंभ लिंगाकृति होउनि त्या नगीं वरद शर्व ॥ ११ ॥
त्या शिवलिंगस्मरणें क्षणमात्रें अमित पतित जन तरले ।
वाटे नव कैलासचि क्षितिच्या भाग्योदयास अवतरलें ॥ १२ ॥
नग शिखरीं हरपार्श्वीं आहे जी भव्य सोमकांत शिला ।
मानिति शिवसमचि तिला प्रस्तर[6] ह्मणतील काय जन अशिला १३
पडतां चंद्रांशुवरी द्रवते अद्यापि ती शिला तोय ।
साक्षात्कार असा हा पाहुनि जन मन सुशांत वहु होय ॥ १४ ॥
वसती मुनिगण तेथें शिव दर्शन सुरस सेविती वहुत ।

---

१ महासागर. २ द्रव्यसंचय. ३ कृपादृष्टि. ४ स्वस्त्रीचें विरहदुःख सहन करणारा. ५ संसारपाशांत सांपडलेला. ६ धोंडा.

कीं तदितर चुकवि जनन-मरण न करिहि पापयवस हुत ॥ १५ ॥
पावविं विलया पापें जें स्थल न झणेल काय लाज मला ।
स्वर्लोका व्यर्थ तुझ्या ठायीं निर्जर समूह रे जमला ॥ १६ ॥
झाला सुक्षेत्रोद्भव भाग्योत्कर्षेंचि सर्व जीवांच्या ।
नाम अशा क्षेत्राचें भावें घेईल धन्य ती वाचा ॥ १७ ॥
भवरोगपीडितातें भवदर्शन[१] अमृतरस सदा सुखवी ।
जनहो ठेवा स्वमनीं कीं शिवपद भजन नित्य नव सुख वी ॥ १८ ॥
या स्थानीं स्वर्गाहुनि सुरवर कौतुक पहावया आले ।
घडतां श्री शिवदर्शन षट्पद कमलीं तसेचि ते धाले ॥ १९ ॥
पाहतां पुण्यस्थाना तन्मतितें होय सोडिता गर्व ।
वाटे कीं तो[२] स्मरला मदनदहन या स्थलीं वसे शर्व ॥ २० ॥
कीं दुर्जनसंगतिधर नावडतो श्री सदाशिवास कदा ।
यास्तव ठेउनि आले काय विबुध त्यास आपुल्याचि पदा ॥ २१ ॥
गाती सांबाचें यश आनंदरसांत मग्न होऊन ।
प्रार्थिति दीना आह्मां युष्मत्पदाविरहदुःख होऊन ॥ २२ ॥
सोडुनि जल अमरांच्या सौख्या राहति सुखें नगीं विबुधें[३] ।
लाभे त्वरित जरीही क्षणिक सुख न इच्छिती कधीं विबुधें[४] ॥ २३ ॥
श्री चंद्रनाथदर्शन–कामें सद्भक्त अमर नर जमले ।
विकसितभक्तिलता–परिवेष्टित[५] ते पुण्यनग[६] नगीं[७] गमले ॥ २४ ॥

---

## अध्याय ३ रा.

---

श्री चंद्रनाथ झाला भक्तां, अतिलुब्ध जेविं हंस सरा ।
वा चंदनास पन्नग अथवा लोभी अमोल्य रत्नसरा ॥ १ ॥

---

१ श्री सांबाचें दर्शन. २ गर्व. ३ देव. ४ सुज्ञ. ५ प्रफुल्लित भक्तिरूप वेलीं-वेष्टित असे. ६ पुण्याचे वृक्ष. ७ पर्वतीं (डोंगरावर.)

 शुक्र लांकूड.

सुगुणी पुत्रा पाहुनि मानुनि घे आपणा पिता धन्य ।
तैसा हर स्वभक्तां पाहुनि मत्सम नसे ह्मणे अन्य ॥ २ ॥
परि कैलासीं विरहें व्याकुळ होउनि तदीय गण सर्व ।
ह्मणती शोधावा तरि कोठें श्रुतिवंद्यपादयुग[1] शर्व ॥ ३ ॥
मुनिजन अमरहि ज्याचा धरिती आसंग[2] अंतरांत सदा ।
तें सांवाविण गमलें सुखदहि कैलास त्यांस शुन्य तदा ॥ ४ ॥
घेउनियां स्वगणाला श्रीशिव शोधीत चंद्रनाथनगा ।
चौघे भैरव आले करुनि पुढें भूतनाथ मान्य जगा ॥ ५ ॥
ज्यांचा शंभुपदांबुज-विरहभिदुर[3] मानसाद्रि करि भग्न ।
ते चंद्रेशनगश्री-रम्य सुमीं मधुप जाहले मग्न ॥ ६ ॥
रम्य सुगंधित कलिका[4]-पुष्पयुत सुशोभिता लता फलिता ।
तरु वेष्टिता पहातां प्रेक्षक जन नयन पावती अलिता[5] ॥ ७ ॥
वाहे मंद सुशीतळ पवन सुमन गंधयुक्त तापहर ।
सुखकर सर्वां जीवां जणु तो निरपेक्षबुद्धि साधुवर ॥ ८ ॥
जाणो त्याच्या स्पर्शें दुःखित जनताप तिमिररूपधर[6] ।
गिरिगव्हरीं दडाला जो चित्तोल्लास शांति हानिकर ॥ ९ ॥
स्व सखाश्रयास राहति हिंसक पश्वादि वेष धर पापें ।
होउनि हतबल चित्तीं श्रीमच्चंद्रेशकीर्ति रवि तापें ॥ १० ॥
कुटिलाश्रयदा लपविति अनुतापें वदन आपुलें काळें ।
यावी सुमति कुमतिही विपरित नाहीं तरी त्र्या काळें ॥ ११ ॥
दुर्दिन त्यांचे सरले झाला अनुताप शुद्धिही घडली ।
भाग्योदया तयांच्या सत्संगति योग्य आलि सांपडली ॥ १२ ॥

---

१ वेदांस वंदन करण्यास योग्य ज्याचें पदद्वय असा. २ संलग्नता ( चिकटून राहणें ) ३ श्री सांवाच्या चरणकमलांचा वियोग हेंच वज्र. ४ रमणीय असा सुवासिक कळ्या फळें यांहीं युक्त. ५ भ्रमरांनीं व. ६ अंधकाराचें रूप धारण केलेला. ७ पर्वताच्या विवरा० ५ ८ आपल्या अंधाररूप मित्राच्या. ९ दुष्टांस आश्रय देणाऱ्या. १० सखी.

ज्यांच्या सुखकर संगें श्रीशिवभजनीं सदा सुधी रमले ।
ते त्यां वेषधरांना दरदं[1] रवि दरींत तापसी गमले ॥ १३ ॥
दुर्दैवी गिरिकुहरें जीं लपविति दारुण्या जना वदनें ।
तीं सत्संगें बनलीं श्री शंकर भक्ति कीर्तिचीं सदनें ॥ १४ ॥
अंतर्बाह्य कठिणता वसते ज्यांमाजि त्याहि चंडशिला ।
कृष्णहि तशाच परि जणु सत्संगें वरिति साधुंच्या शीला ।१५।
ज्यांची शीतल छाया आश्रित हृत्ताप सर्वही हरिते ।
अलियुत सुम[3]फलभारें नत तरुवर निर्झराश्रया[4] वरिते- ॥ १६ ॥
जणु ते निर्झर गुरुवर गमले सच्छिष्य तरु तयांपुढतीं ।
अतितरसादरचित्तें परोपकृति[5]तत्वसंहिता पढती ॥ १७ ॥
मधुसमयीं[6] मधुरासव[7] प्राप्तमधुश्राव[8] मंजरीयुक्त ।
गंगायुक्त जटाधर मधुकंठ[9]हि जणु तदीय सद्भक्त ॥ १८ ॥
श्री शिवगुणगणवर्णन आनंदें पंचमस्वनीं करिती ।
नित्यनुकरणें त्यांच्या भृंग यथाशक्ति रसकलं[10] वरिती ॥ १९ ॥
विसराति तृषा क्षुधा परि निजशिशुसंगोपना न विसरति जे ।
प्रीति जयांची ऐशी तेहि हरिण गानलुब्ध भक्त तिजे ॥ २० ॥
सर्व त्याग करुनि जणु लक्ष तिहीं लाविलें तया भजनीं ।
वाटे शिवभक्त्यभिरुचि लावियली त्यां नगस्थ भक्तजनीं ।२१।
ऐसें स्थल हें श्रीहर-विरहानल तप्त जन मना शांत- ।
करि,सूचवी हि शि वरीं दीन दयाघन वसे उमाकांत ॥ २२ ॥
जणुं तद्भाग्यनभांतुनि नगभा[11] रविभाचि[12] ती तदा आली ।
रमली शिवपदनलिनी त्यजुनि विरहशुष्ककाष्ठ[13] आलि आली।२३

१ भय देणार. २ स्वनावास. ३ भ्रमरानीं युक्त फुलें आणि फळें यांच्या भारानें. ४ झऱ्यांच्या आसपास असलेले. ५ परोपकार तत्वांचा ग्रंथ. ६ वसंत कालीं. ७ आं- ब्यांचें झाड ८ ज्यांतून मध गळत आहे असा मोहोर आलेले. ९ भ्रमर. १० बारी- क जो मधुर स्वर. ११ पर्वताची शोभा. १२ सूर्यप्रकाश १३ विरहरूपी सुकें लांकूड.

त्यां भैरवांस शंकर-दर्शन तृषितांस नीरसें सुखवी ।
आल्या न वर्णवे मज तद्दर्शन योग जें अमित सुख वी॥ २४॥
नमिती हर्षें नाचति सार्थक ते मानुनी स्वजननाचें ।
तो धन्य होय शंकर-भजनीं जो प्रेमयुक्त जन नाचे॥ २५॥
श्रीभूतनाथ भैरव सविनय शयं[1] जोडुनी तदा बोले ।
भो गिरिजेशा आह्मां दीनां सोडूनि फार दिन झाले॥ २६॥
रोष असा कां करितां देवा गरिबांवरी दयासिंधो ।
कां दर्शन एकाकी दुर्लभ केलें अनाथजनबंधो॥ २७॥
कैलासीं सर्वांला लोटुनि विरहांत या नगीं रमतां ।
करुणाघना अशि कशी स्वमनींची नष्ट जाहली ममता॥ २८॥
तव रोषानलबाधा न घडो आह्मांस भो जगन्नाथा ।
देशिल भिक्षा इतुकी तरि नाचूं आज करुनि धिन्ना था॥ २९॥
देवा या कैलासीं त्वत्पदनीरदपथास[2] चातक सा ।
तवजनकदंब पाहे लावितसां व्यर्थ कां तयास कसा॥ ३०॥
चित्तोध्यांनीं पेटे होइल तद्दाह केविं त्यां सहन ।
भो करुणामृतवर्षें विझवा तो त्रासकर विरहदहन॥ ३१॥
षड्पुंहुनि शतपट जो तापद तव विरह त्याचिया दहना ।
लाविसि उशीर कैसा निजजनरक्षणपरा[3] मदनदहना॥ ३२॥
श्रीहर हांसोनि ह्मणे सुर भूसुर अमित नमुनियां येथें ।
तपती मत्प्राप्तीस्तव बोलवितां कां तुह्मी मला तेथें॥ ३३॥
राहुनि तुह्मीहि येथें सुखरा भक्तांस अभय देऊनी ।
हरुनी तापभयातें पांथां सुख जेविं वृक्ष देऊनीं॥ ३४॥
श्रम घेउनियां आलां कां तैसे इच्छितां परत जाया ।
स्वस्थ असावें येथें पर्वत हा स्वाश्रयें सु साजाया॥ ३५॥

---

१ हात. २ तुझ्या पदरूप. मेघाचा मार्ग. ३ स्वजनांचे रक्षण करण्यास समर्थ अशा

येथेंचि भूतनाथा राहें पाहोनि जे तुझें वदन ।
मातें वंदन करिती ते वरितिल सत्य मुक्तिचें सदन ॥ ३६ ॥
ऐसा निदेश होतां हर्षें प्रमथादि गण तदा ह्मणती ।
श्री सांबा नित्य घडो त्वत्पदपद्मास आमुची प्रणती ॥ ३७ ॥
राहे सांबासन्निध आनंदें सगण भूतनाथ नगीं ।
त्या निरुपम सुक्षेत्रीं भजती सांबास तेच धन्य जगीं ॥ ३८ ॥
श्री चंद्रेशा नमिती वंदुनि श्री भुतनाथ पद्भावें ।
ते भवसागर तरती भवपदकामी तयां सदा गावें ॥ ३९ ॥
पूर्वीं असंख्य ऋषिगण क्षत्रियही सांब भक्तिला करुनीं ।
सार्थक निजजननाचें करिती भव सागरा सुखें तरुनीं ॥ ४० ॥
या सुस्थानप्रभवें वरिती शिवभक्त सिद्धि कार्यांची ।
अंतीं पावति शिवपद पदवी लाभे तयांस आर्यांची ॥ ४१ ॥
जे जे अधिष्ठिती या चंद्रेशनगास धन्यता वरिती ।
त्या त्या प्रसिद्ध तीर्थीं जीं जनपातकमला सदा हरिती ॥ ४२ ॥
भारद्वांजाऽऽवष्ट, गौतम, कापील, सौभ, शर्मिष्ट, ।
चंद्रोदयादि तीर्थें यत्सेवन आशु पुरवितें इष्ट ॥ ४३ ॥
आहित "अमित" तीर्थें परि संकोचार्थ वर्णिलीं थोडीं ।
हरपद कामुक ज्यांची भावें घेती सदैवही गोडी ॥ ४४ ॥
यज्ञ यजन कलिमाजी करण्या निःशक्त विप्र जाणोनी ।
सदयें गिरिजानाथें जनकरुणा ही मनांत आणोनीं— ॥ ४५ ॥
निर्मियलीं हीं तीर्थें दर्शन ज्यांचें सदा करी मुक्त ।
बहुविध दुःखापासुनि जन ठेउत हें निजांतरीं सूक्त ॥ ४६ ॥
कारि पातक नाशातें तीर्थाचा बिंदु अल्प वन्हि जसा ।
जाळी तृण, धन्यचि जे सेविति सद्भावयुक्त या सुरसा ॥ ४७ ॥

सर्पीण.

---

श्री सांबाचें स्थान जें कैलास त्याची इच्छा करणारांनीं. २ वसुष्ट्निं मोकळे.

सुलभ सुपथ ऐसा हा गतिचा भाविकजनांस दाखविला ।
करुणाघन चंद्रेशें तीर्थमिषें भक्तिरसचि चाखविला ॥ ४८ ॥
जे भावें या सेविति ते होती त्वरित शिवपदा पात्र ।
नलगे सांगाया हें भाव जया, तोच मुक्तिचें पात्र ॥ ४९ ॥
यां तीर्थांच्या प्रभवें जे सद्भाविक भवार्णवा तरले ।
चंद्रेशयशोदुंदुभि–नादचि[1] ते त्रिभुवनीं जणू भरले ॥ ५० ॥

---

## अध्याय ४ था.

---

श्रीशिवपदारविंदीं यश गायन गुंजना करुनि भावें ।
भक्ताऽलि मग्न झाले वाचे तें शिवद[2] नाम तूं घ्यावें ॥ १ ॥
अगणित पापी जन ज्या नामें दुस्तर भवार्णवा तरले ।
त्यांचें साम्य वराया इंद्रादिक देव सर्वथा हरले ॥ २ ॥
निगमागम गाती हें वर्ण चतुष्टय सदा "सदाशिव" हो ।
जें वर्णन कर्त्याला प्रेमें ह्मणतें तुह्मां सदा शिव हो ॥ ३ ॥
नाममहत्वा नुमजुनि घेतिल शिवनाम जरिहि मूढमती ।
निःसंशय ते वरितिल नामप्रभवें सलोकतादि गती ॥ ४ ॥
रुग्णा भेषजसेवन नकळत घडतांहि जेविं ताप हरी ।
हरनाम पतितवाचे येतां तें सर्व दुःखमुक्त करी ॥ ५ ॥
जेविं अजामिळ तरला हरिनामोच्चारणें तसाचि खळ ।
अंवष्टहि[3] तरला कीं हरनामें दुःखसागरा प्रबळ ॥ ६ ॥

---

१ श्रीचंद्रेश्वराच्या कीर्तिदुंदुभीचे नाद. २ कल्याणदातें ( शुभप्रद ) ३ ब्राह्मणा पा- ...म झालेल्या मुलास " अंवष्ट " असें ह्मणतात, त्या त्याच्या जातिवाचक ना-
१ हात. २ ... ...ळखत असावं.

तें रम्य चरित सादर करितों श्रोत्यांपुढें परम हर्षें ।
कीं तोष होय चरित–श्रवणें या जेविं विधुदिनीं[१] दर्शें[२] ॥ ७ ॥
होता कुशावतीच्या तीरीं सवधू महा पतित दुष्ट ।
अंबष्टाऽभिध ज्याचें वर्तन दे सज्जनांऽतरा कष्ट ॥ ८ ॥
नित्य वसोनी विपिनीं शरपाशीं जीवजीवनास[३] हरी ।
पल भक्षणें तयांच्या अति निर्दय तो भरी स्व–उदरदरी ॥ ९ ॥
परघात चौर्य मिथ्या-भाषण इत्यादि पातकीं थोर ।
झाला हा परि बाधे चिंता यमलेखका मनीं घोर ॥ १० ॥
कीं तद्दुष्कृत लेखन करितां गेले कितीक तरि अब्द ।
तत्पुण्यलेखनीं ही सवयींचा हात लिहिल अपशब्द ॥ ११ ॥
कोरे कागद काळे करितां करितांहि लेखणी दमली ।
जणु कृष्णानन[४]भुजगी कर्दलिगर्भावरी विषा वमली[५] ॥ १२ ॥
ऐसा अंबष्टाऽभिध पापांचा होय मूर्त अवतार ।
तद्भर सुदुःसहत्वें[६] भूमि ह्मणे ईश्वरा मला तार ॥ १३ ॥
गेला एके दिवशीं उतरोनी श्री कुशावती तीर ।
जेथें वसति शिवयशो–वक्ते ते मुक्त[७] भक्तजन कीर ॥ १४ ॥
शुक्ल श्रावणपूर्णा विधुवासर हा असे सुयोग दिन ।
सांबार्चन या समया घडतां कैलाससुख वरी दीन ॥ १५ ॥
यास्तव सद्धात्विक जैन जमले चंद्रेश्वरासि उत्साहा ।
खळही जाय कराया त्या सुजनांची अभद्र कुत्सा हा ॥ १६ ॥
सारूनि नित्य कर्में जातां शिवपूजनास शिखराशी ।
अंबष्ट जाय त्यांच्या संगें जो स्पष्ट मूर्त अघराशी ॥ १७ ॥
रम्यसुवर्णमयनगा झाला अद्भुत कलंक हा प्राप्त ।

---

१ सोमवारीं. २ आमावास्येनें. ३ प्राण्यांच्या आयुष्यास. ४ काळतोंडी सर्पीण. ५ ओकली. ६ त्याचा भार सहन करण्यास फार कठीण पडल्यामुळें. ७ मोकळे.

जेथें हरोमहरहर हरशिव शंकर अशी ध्वनि व्याप्त ॥ १८ ॥
की दृग्बाधाऽऽकर्षक विद्रुपाऽऽकार हा दुरितकाय ।
पुण्य शिवद भक्तीच्या या सुक्षेत्रांत ठेविला काय ॥ १९ ॥
राहे बाहेर उभा पाहे देवालयांत तो दुष्ट ।
शिवदर्शन दुष्टाही घडतां तो होय निश्चयें सुष्ट ॥ २० ॥
शिवमंदिर प्रवेशा असमर्थ असे सदा पतित काय ।
ह्मणुनी द्वारींच उभा शिवमानसपूजनास करि काय ॥ २१ ॥
अनुतापपर्वतोद्भव चित्ताची शुद्धता सुजलसरिता ।
तन्मज्जन करुनी हा श्रीशिवपदपद्म अंतरीं धरिता-॥ २२ ॥
सभ्दाव गंध उत्तम, स्वमनसुमें-काग्रदृष्टिदीपातें ।
अर्पुनि तत्पदसेवा-अभिरुचि नैवेद्य दीनजनपातें ॥ २३ ॥
तांबूल प्रेमाचा समर्पुनी पंचतत्वमय काय ।
श्री मच्चंद्रेशपदीं समर्पितो मंत्रपुष्प हें काय ॥ २४ ॥
ऐसें श्री शंभुपदीं कविचित्तोद्ध्यानिचें सुमनसुमन ।
परि त्या पार्शी कोठें प्रियकर सांबास जें विमल सुमन ॥ २५ ॥
श्री सांबाचें पूजन षोडश उपचारयुक्त कैक जन ।
पंचोपचार कोणी भावें करिती कितीक हरभजन ॥ २६ ॥
कोणी सानंदमनें वाहति सांबास लक्ष बिल्वदलें ।
कितिजन सहस्र कोणी अष्टोत्तर कितीकि वाहती कमलें ॥ २७ ॥
कोणी धत्तूरसुमें अर्पिति चंद्रेश्वरा विमल सुमनें ।

---

१ दृष्टीचा दोष आकर्षण करणारा ( हें विद्रूपाकाराचें विशेषण. ) २ भयंकर आकृति ( शेतांत वगैरे ठिकाणीं दृष्टीबाधा न व्हावी ह्मणून जीं कांहीं तृणादिकांचीं, भयंकर चित्रें करून ठेवितात, त्यांच्यावर अगोदर नजर पडली ह्मणजे तें चित्र, पाहणाऱ्याचा दृष्टिदोष आपणाकडे ओढून घेतें असा समज मानितात. ) ३ स्वमन हेंच सुम ( पुष्प ) आणि एकाग्र दृष्टि हा दीप यातें. ४ त्याच्या ( श्री सांबाच्या ) पदसेवेची गोडी. ५ धोत्र्याचें फूल. ६ शुद्ध अंतःकरण.

हरहर शब्दें गर्जति किति जन करिती प्रदक्षिणा नमनें ॥ २८ ॥
श्रीवास[१]घनरसादिक द्रव्यें होती शिवालयांत हुत ।
बहुविध नैवेद्याचीं ताटें सांबासि अर्पिती बहुत ॥ २९ ॥
बाहेरुनि अंबष्टा दिसलें जें सर्व देउळीं घडलें ।
झडलें पाप तयाचें शिवदर्शन पुण्य त्या सहज जडलें ॥ ३० ॥
ऐसें श्रीशिवपूजन पाहुनि आश्चर्यसागरीं पडला ।
सहज विनोदास्तव त्या उपवास अपूर्व शुभदिनीं घडला ॥ ३१ ॥
अवलोकुनी महोत्सव आनंदोत्फुल्लतर[२] दिनेश करीं ।
आलिंगुनि शिवभक्तां निरुपायें सागरीं प्रवेश करी ॥ ३२ ॥
जणुं अहिलोकीं[३] होतां रवितेजासह[४] सुवृत्त हें प्रकट ।
सुप्तोत्थितसा विधुये क्षितिजावरि दावित स्वपूर्णवर्ट[५] ॥ ३३ ॥
निजनाथभक्तसमुहा पाहुनि अमृतांशु तोहि[६] बहु हर्षे ।
पाहुनि शिवभूषणविधु जो परसौख्यार्थ कौमुदी[७] वर्षे ॥ ३४ ॥
श्रीजगदीश्वरगिरिजा-वरदर्शनभजन करि जयां मुदित ।
त्यां सर्वांशीं भिक्षा मागे अंबष्ट हा बहु क्षुधित ॥ ३५ ॥
क्षुधितावस्था पाहुनि दिधलें कोणी तयास जें काय ।
बांधुनि वस्त्रामाजी भक्षाया तें वनांतरा जाय ॥ ३६ ॥
आजन्म न अनुभविला उपवास घनप्रहार[८] ज्या घडला ।
ऐसा पापमहोपल उत्संगांवरुनि[९] काय गडगडला ॥ ३७ ॥
ऐसा तो क्षुध्याकुल कांतारीं निर्जन स्थलीं बैसे ।
आठवि तें शिवपूजन बोले सविनोद सांब हर ऐसें ॥ ३८ ॥

---

१ श्रीवास ( एक प्रकारचा सुगंधीक धूप, ज्यास ईतेस ह्मणतात ) घनरस ( कापुर ) इत्यादि. २ आनंदानें फार फुगलेला. ( मोठा झालेला ) ३ पाताळांत. ४ सूर्य प्रकाशा बरोबर. ५ आपला पूर्ण वर्तुलाकार. ६ चंद्रेश्वरभक्तांचा समूह ७ चांदणें, ८ घणाचा आघात ( ठोका. ) ९ पर्वताच्या उतरणी वरून.

बोले विनोदयुक्तचि शिव शंकर हर वनांत अंबष्ट[१]
परि शिवनामोच्चारें बनला तो पुण्यनग जनीं स्पष्ट ॥ ३९ ॥
क्षुद्बाधा शमवाया ग्रास मुखीं घालितां गळां अडला ।
गिळिल कसा जरि दृढतर काळाचा पाश त्याजला पडला ॥ ४० ॥
यमपाश गळां पडतां स्थूलवपुसि सूक्ष्मदेह तैं सोडी ।
ओढित नेती त्या यम-दूत जयां अंतरीं दया थोडी ॥ ४१ ॥
यमभट वळकट बांधुनि सट सट मारीत त्यास बहु सोटे ।
नेतां दुरूनि परिसति "मूर्खांनो यांसि नेतसां कोठें" ॥ ४२ ॥
होउनि भयभीत मनीं ह्मणती ते भृत्य शब्द कोठूनी ।
करिती कोण असा कीं यत्श्रवणें हृदय जाय फाटूनी ॥ ४३ ॥
अन्योन्यीं जों ऐसें वदती तों जवळ पातले दूत ।
श्रीसांबाचे ज्यांच्या आंगावरि पुंड्र विभुतिचे पूत ॥ ४४ ॥
ज्यांच्या कंठीं शोभति रुद्राक्षांच्या मनोरमा माळा ।
शूलादि तिव्र शस्त्रें हस्तीं जीं नित्य दापिती काळा ॥ ४५ ॥
तोडुनि पाश तटाटां दरडाविति यमभटांसि शिवभृत्य ।
भ्याले मनीं तयांचें अत्यद्भुत पाहुनी असें कृत्य ॥ ४६ ॥
पुसती बहु नम्रपणें श्रीशिवदासांसि अनुग धर्माचे ।
व्यत्यय कां करितां हो व्यर्थ तुह्मी पुरुष नीति धर्माचे ॥४७॥
धर्माज्ञेनें नेतां या पतिता नारकास अपाया ।
मध्येंच सोडितां कां कां मोडितसां सुनीतिचा पाया ॥ ४८ ॥
हरपार्श्वग शमनाच्या अनुगां वदती न हा असे पापी ।
निःसंशय तो मूर्खचि जो अनघां तित समजुनी दापी ॥ ४९॥
ज्याचें आज्ञाधारण करितां त्या समजतां कसा धर्म ।
कर्तव्य सोडुनी जो सांगे ऐसें अनीतिचें कर्म ॥ ५० ॥

---

१ पवित्र. २ पातकरहितास.

तुमचा पालनकर्ता धर्म नया त्यजुनि वर्ततो स्पष्ट ।
मग तो धर्म कसा जो अनघासहि देतसे वृथा कष्ट ॥ ५१ ॥
त्याचे आज्ञाधारक देतिल कैसे जनांतरा तोष ।
स्वामी तैसा सेवक याचा न तुह्मांकडे वसे दोष ॥ ५२ ॥
यमभट पुसती कांहो दुष्टांला दंडितां असे दोष? ।
अस्मन्नाथा दूषण देउनि कां व्यर्थ करितसां रोष ॥ ५३ ॥
अंबष्ट नाम याचें यासम हा[?]वी असे पतित नर कीं ।
यास्तव वास्तव्य अशा पतितास अयोग्य काय हो नरकीं । ५४ ।
शिवदूत वदति सज्जन न त्यजिति विचार कृत्य करितांना ।
निष्पापाऽऽनयनाऽज्ञा ज्ञाता यम तरि कदापि करितांना । ५५ ।
दर्शन शिवलिंगाचें घडलें हा ह्मणुनि होय निष्पाप ।
शिवनामोच्चारणही घडतां बांधेल या कसा ताप ॥ ५६ ॥
श्री शिवनामप्रभवा नुमजे तो धर्म जाणता काय? ।
समजेल कसें त्या शिव-दर्शनमाहात्म्य तें कसें काय ॥ ५७ ॥
शिवदर्शन प्रभातीं घडतां रजनीकृताऽघ शम होय ।
आजन्मकृताऽघाला क्षालक माध्यान्हदर्शन सुतोय ॥ ५८ ॥
घडतां संध्यासमयीं शिवदर्शन सप्तजन्म कृत पाप ।
नासुनि पुण्यप्राप्तिहि लाभे मग यांस कोठचे ताप ॥ ५९ ॥
श्री शिवनामोच्चारें वरिती पापी सलोकतादि गती ।
हे नियम सोडुनी कां झाला यमराज परम मूढमती ॥ ६० ॥
करुनि विचार करावें कृत्य पुढें तरि असें यमा सांगा ।
अपराध बहुत झाला ह्मणुनी याशीं तुह्मी क्षमा मागा ॥ ६१ ॥
ऐसें सुचउनि घेउनि गेले बसऊनि दिव्य यानांत ।

---

१ पतक रहितास आणण्याची आज्ञा. २ जन्मापासून आचरलेल्या पातकास. क्षालन करणारें ( धुणारें. )

कैलासीं; ज्याच्या ये सहज श्री सांबनाम वदनांत ॥ ६१ ॥
त्या श्रेष्ठाचें स्मारक नामें प्रख्यात तीर्थ आंबष्ट ।
जें सेवन कर्त्यांचें मन गतिदानें करी सदा हृष्ट ॥ ६३ ॥
पक्षांतसोमवासर[1] ऐसा साधून योग जे करिती ।
त्या तीर्थीं जन मज्जन श्री शिव वसतीस निश्चयें वरिती । ६४ ॥
जें अंबष्टोद्धरणा नाम करी तें वदो सदा वाणी ।
मागे ऐसें शिवपद–शरणागत विष्णु जोडुनी पाणी ॥ ६५ ॥

---

## अध्याय ५ वा.

होता ख्यात महीपति कपिलाऽभिध चालवी सुखें राष्ट्र ।
यत्तेजसदाचरणें न शके राज्यावलोकना राष्ट्र[2] ॥ १ ॥
याचक जन हृत्तोषद तो सद्धर्मी प्रजाऽवनीं खपला ।
जपला निज कर्तव्या तैसा देहा न ही कधीं जपला ॥ २ ॥
तनयीं वात्सल्य जसें तैसें नृप जो प्रजाजनांत करी ।
यद्यश पळवी अरिला हरिचा[3] रव जेविं परवनांत करी ॥ ३ ॥
त्या तैशाही भूपा दुर्दैवाचा पडे पहा फेरा ।
सोडिल कां कुदशा मग पडतां राष्ट्रास शत्रुचा घेरा ॥ ४ ।
जरि बहु शौर्यें लढला रिपुशीं[4] करि पात्र अपयशा दिष्ट ।
करि जें निर्बल सबला क्षणमात्रें, दुष्ट बांधवाऽऽदिष्ट[5] ॥ ५ ॥
दुर्दैवानें दिधलें साहे अपमानजन्य तो दुःख ।
जैसा निरुपायें श्री–जगदीश्वर शिव जसा सुतिव्र विख ॥ ६ ॥

---

१ पक्षांत (पौर्णिमा) व सोमवार. २ परचक्र, रोग, अनवृष्टि इत्यादिकांपासून जें राज्यास भय तें ३ सिंहाचा ४ शत्रु ५ बंधू इत्यादि जे आपले इष्ट (आवडते)

गेला पळोनि विपिनीं दृष्टि चुकउनी स्वशत्रु सैन्याची ।
हा हा कमाल झाली त्याच्या दुर्दैवदत्त दैन्याची ॥ ७ ॥
तो सुज्ञ भूप मनिंच्या दवडी करुनीं विवेक त्या तापा ।
होऊनि विरक्त ह्मणे मोहादिक हो न या तुह्मीं दापा ॥ ८ ॥
आणूंनका स्वचित्तीं कीं भिउनि तुह्मांस मीं असें मागें ।
जैसे माझे तैसे गेले तुमचेहि दिवस ते मागें ॥ ९ ॥
नाहीं भय मज तुमचें झालों निस्पृह सदा असें हृष्ट ।
व्यर्थ तुह्मांला होतिल श्रम ह्मणुनी सांगतों असें स्पष्ट ॥ १० ॥
भ्रमला वनांतरें मग चढला श्रीं चंद्रनाथनगशृंग[1] ।
झाला हर्षित श्रीशिव--लिंग कमल पाहुनी कपिल भृंग ॥ ११ ॥
राहे त्या सुस्थानीं आराधी नीलगल मनोभावें ।
ऐशा प्रेमलमन हर–भक्ताचें यश गतीच्छुनीं गावें ॥ १२ ॥
स्नान त्रिकाल करि तो सेवी मित अन्न नित्य नियमानें ।
ठेवी सद्वर्तन ज्या भ्यावें स्वमनांत पाहुनि यमानें ॥ १३ ॥
जें ज्ञानमानदायक जें नाशी पाप दाप शमनाचा[2] ।
जें सांगे आनंदें भक्तसमूहांत वरुनि शर्म[3] नाचा ॥ १४ ॥
तें आराधन घडतां यातें तोषेल कां न मग शर्व ।
अवलोकितो नृप ज्या चंद्रेशा वंदिती विबुध सर्व ॥ १५ ॥
भक्ताराधन हर्षित तो पशुपति माग वर ह्मणे कपिला ।
वत्सा असा उगा कां कां कष्टवितोस ही अशी कपिलों[4] ॥ १६ ॥
शंभूचें पददर्शन घडतां प्रत्यक्ष तो गळां पडुनी ।
लोळे तच्चरणावरि आनंदें तोकसाच गडबडुनी ॥ १७ ॥

---

१ श्रीचंद्रेश्वर पर्वताचें शिखर २ यमाचा. ३ अंतःकरणांत कामक्रोधादि किंवा संकल्प विकल्पादि ज्या अनेक वृत्ति उठतात तद्राहित्यें करून स्वस्थ जी अंतःकरण स्थिती तो. ४ गाय.

अमरादिकां सुदुर्लभ भवभयहरहरपदाब्जरज वंदी ।
प्रेमें गुणगण वर्णी बद्धांजलि होउनि जसा बंदी ॥ १८ ॥
स्तवलोलुप सांब पुन्हा बोले वर माग शिघ्र बा साधो ।
कीं तुज वरप्रतापें नच बाधो ताप कार्य तव साधो ॥ १९ ॥
सविनय तो भूप ह्मणे तुजला ठाउक असे मदिच्छा ती ।
सर्वज्ञा परमेशा अपमानें मम विदारिली छाती ॥ २० ॥
याहुनि तुज काय कथूं नच हो त्वत्पद वियोग भो मातें ।
देतां तरि द्या हा वर कीं यामध्येंच सर्व शिव मोतें ॥ २१ ॥
वत्सा कपिला अरिला जिंकुनि करिशिल सुखें तुझें राज्य ।
अंतीं कैलासींचीं वरिशिल चिरकाल तूं सुखें प्राज्यें ॥ २२ ॥
ऐसा वर देउनि हर झाला अदृश्य भक्तहितकर्ता ।
हर्ता दुःखाचा जो स्वजना चुकऊनि भवनदीऽऽवर्ता ॥ २३ ॥
श्रीहर वर प्रतापें मिळलें त्या राज्य शत्रुनीं हरिलें ।
हरिलें गर्व तयांचें स्वयशानें सत्यपांऽइही भरिलें ॥ २४ ॥
कपिला दर्शन दिधलें श्रीकंठें व्यक्त हें जनीं व्हाया ।
कपिलाऽऽख्य तीर्थ आहे त्या पुण्यनगीं जनास गति द्याया । २५ ।
श्री गोत्तम ही ठेवी स्मारक जें आपुलें तया नाम ।
गोत्तम तीर्थ असे जें जन सुहिताचें वरी सदा काम ॥ २६ ॥
पूर्वी द्वापारयुगीं गोत्तम मुनिवर्य या नगा राहे ।
नित्य करोनी अर्चन भावें चंद्रेश्वरास मन वाहे ॥ २७ ॥
अति वार्धक्यें झालें जीर्ण वपु क्षीण जाहली शक्ती ।
ऐसा तो परि सततचि नगशिखरीं शंभुची करी भक्ती ॥ २८ ॥
हृद्धें प्रीतिपुरःसर अर्पण केली जिला स्वहृत्तेरुगी ।

१ संसारभय हरण करणारे श्री सांबाच्या पदकमलाचे कण. २ मावर्ते. ३ पुष्कळ. ४ संसाररूपी मोठ्या नदीच्या भोंवऱ्यास. ५ आपलें अंतःकरणरूपी पांढऱ्या गुलाबाचें फूल.

श्री शंकरभक्त्यभिरुचि चढवी वर त्यास ती सती तरुणी ॥ २९ ॥
वार्धक्यासिंधुमाजीं तरुणी वृद्धास छिद्रमय तरणी ।
कधिं एका सत्तरणी होते लक्षांत एक तत्तरणी ॥ ३० ॥
रुद्रीय सूक्त शतकरि समर्पण श्रीगलास सद्भाव ।
पूजा सांग करी मग तो सद्योजातमंत्र जप भाव ॥ ३१ ॥
ऐशी भक्ति तयाची अवलोकुनि हर्षयुक्त बहु झाला ।
प्रेमें दर्शन घ्याया वृषभासन हर तदाऽऽश्रमा आला ॥ ३२ ॥
गोत्तम जों शिवपूजन करुनि यथासांग आश्रमीं आला ।
तों स्वजनचकोरकविधु पाहुनि दारांत अंतरीं धाला ॥ ३३ ॥
घाली आलिसाच उडी शंकरपदपंकजावरी विप्र ।
तों शिव वदे त्वदिच्छित वर वर वर भक्तगोत्तमा क्षिप्रें ॥ ३४ ॥
देवा मज तव पूजन नित्य घडो त्याविणें नको अन्य- ।
वर, यास बरी वाटे स्थिति परमार्थ दाचि ही अशी वन्य ॥ ३५ ॥
पतितां प्राप्त असावें मद्भक्तिफळें सदा तुझें स्थान ।
अतितर हर्षित होइन देतां इतुकेंच ईश्वरा दान ॥ ३६ ॥
झाला गुप्तप्रभुवर इच्छित वर देउनी परम भक्ता ।
सदयपणा हा ऐसा थकणारचि वर्णितां कुशल वक्ता ॥ ३७ ॥
गोत्तम सुयशःस्मारक जें विज्ञवी दुरित पावकोऽऽहृतें ।
चंद्रेश्वर शिखराच्या दक्षिण भागास तीर्थ आहे तें ॥ ३८ ॥

---

## अध्याय ६ वा.

श्रीशंकरयश जैसें तैसें शिवभक्तयश जनां सेव्य ।
हें प्र शशि भक्तिरसातच्छ असे यापुढें रसाहि दिव्य ॥ १ ॥

---

१ प्रौढ स्त्री. २ सद्भावयुक्त. ३ अर्घ्य (अश्रु) ४ लवकर. ५ पातकरूपा अग्निज्वालेस.
६ स्वर्गांतला ( हें विशे॰ रसाचें. ) दिव्य रस-अमृत.

तैसाचि तीर्थ महिमा सुगतिच्छाकर जनां असे गेयं[1] ।
स्नान जयांचें पतितां दे गिरिजारमणभक्तिचें श्रेय ॥ १ ॥
दीनदयालु श्रीहर निर्मुनि त्या श्रेष्ठ पर्वतीं तीर्थें ।
भक्ताऽऽह्वाख्यात[2] करी जीं दीना तर्पिती स्वसलिलाऽर्थे[3] ॥ २ ॥
ऐसा सर्वांवरि करि तीर्थें निर्मूनि अमित उपकार ।
यत्स्मरण हरी निमिषें भवसागर पतन जन्य अपकार ॥ ४ ॥
तत्पद वंदुनि पूर्वी आरंभिन सौभपति चरित्रास ।
ज्या श्रीशिवभक्ताचा यशोंबुद[4] अघाऽग्निचा हरी त्रास ॥ ५ ॥
पूर्वी सौभनृपति या सुक्षेत्रीं पातला, गुहेमाजी ।
राहोनि शिवाराधन करि, आकळुनी सदा मनोवाजी[5] ॥ ६ ॥
स्वेच्छाचारि मनाला बोधी वर्जावया इतर धंदे ।
श्रीशिव भजनावांचुनि, कामप्रमुखादिकां करी वंदे ॥ ७ ॥
त्यां सेवकांस खपवी भक्तिपथाच्याच उत्तमीं कामीं ।
स्वमनीं श्रीशिवहि ह्मणो आहे तव युक्ति हे नृपा नामी ॥ ८ ॥
त्यांच्या कडून त्यांचे खोडविले मार्ग त्या नृपें सर्व ।
झाले लज्जित भारी करितां स्वविरुद्ध काम हतगर्व ॥ ९ ॥
अवघे सहा असोनी ब्रह्मांडीं करिति जे दिसा बंड ।
त्या तैशांही चोरां भूप करी युक्तिनें असा दंड ॥ १० ॥
साधक लोकाऽऽनंदीं विघ्नकरायास हौस बहु ज्यांना ।
वाटे सक्तमजूरी कृत अनयें प्राप्त जाहली त्यांना ॥ ११ ॥
नेला भवाऽटवींतुनि[6] मार्ग सरळ मुक्तिसदनँ पावेतों ।
उत्कंठित चित्तें निज–सदन द्वारांत मुक्ति पावे तों ॥ १२ ॥
कीं येइल त्या वरुनी प्रियकर हरदास, त्यास पाहीन ।

---

१ गाण्यास योग्य. २ भक्तांच्या नांवानें प्रसिद्ध. ३ आपल्या उदकरूपी द्रव्यानें. ४ कीर्तिरूपी मेघ. ५ मनरूपी घोडा. ६ संसाररूपी अरण्यांतुन. ७ भक्तीनें ...

केव्हां ऐसें तिजला झालें, प्रिय जीस अन्य कांहीं न ॥ १३ ॥
तात्पर्य करी खडतर नृप तप जप करुनि सांबनावांचा ।
जो ह्मणतसे भवनदोऽग्रावर्तीं भ्रमुं नका जनां वांचा ॥ १४ ॥
वर्जी अन्ना सेवी क्षुत्[1]शमना स्वल्प तीर्थ तो राजा ।
तत्तप त्यासि ह्मणेवा निर्विघ्नपणें भवाब्दि तीरा जा ॥ १५ ॥
निजभक्तकल्पपादप भव भवभव[2]दुःखमुक्त त्यांस करी ।
देउनि दर्शन सुखवी हिमकर जैसा चकोरताप हरी ॥ १६ ॥
भोक्ता अढळपदाचा भव[3], दे भव त्या नृपासि वर ऐसा ।
अल्पें उदंड दाता श्री शिव जैसा न कोणिही तैसा ॥ १७ ॥
मग बहु कालें येतां मरण तया सांबदूत न्यायाला ।
आले विमान घेउनि प्रार्थिति वैसावयास रायाला ॥ १८ ॥
वसतां यानीं नृपवर वरसुमनें अमर वर्षती नाकी ।
निमिषार्धें दूत तयां भेटविती भक्तवत्सल पिनाकी ॥ १९ ॥
शिवभक्त सौभपतिचें स्मरणकर सुतीर्थ त्या नगीं आहे ।
नामें सौभ असे जें ध्याया सुगतिस जनां सदा बाहे[4] ॥ २० ॥
त्या तीर्थाचा महिमा गातां पतितां घडे सदा मुक्ती ।
सेवन घडेल त्यांला ते धन्य खरे न ही मृषा उक्ती ॥ २१ ॥
श्री चंद्रेशा पासुनि आग्नेयेला पवित्रेतर तीर्थ[5] ।
चंद्रोदयाऽऽख्य आहे तत्सेवनकर सदा जनीं [6]तीर्थ ॥ २२ ॥
पूर्वी पापाचरणें क्षयरोगें त्रस्त चंद्र बहु होय ।
तत्परिहारार्थ करी सुक्षेत्रें हिंडण्यास तो सोय[7] ॥ २३ ॥
फिरुनी स्थळें अमित या चंद्रेश्वर पर्वता शशी पावे ।
पाहे तीर्थ जयाच्या दर्शनमात्रेंचि त्रस्तमन धावे ॥ २४ ॥

---

१ क्षुधेच्या शमनार्थ. २ संसारजन्य दुःखा पासून मोकळा. ३ हो ( भव हें संस्कृत धापर. ) ४ बोलावीत आहे. ५ अति पवित्र. ६ श्रेष्ठ. ७ सुरवात.

त्या तीर्थाचें सेवन घडतां त्या स्वस्थता जरा दिसली ।
मिळतां असा त्वरित गुण श्रद्धा तीर्थावरीच त्या वसली ।२५।
तेथेंचि वसे सेवी सद्भावें तें सुतीर्थ शीतकर ।
करि आल्हाद जयाचा पडतां आंगावरी सुशीतकर ॥ २६ ॥
विधु मुक्तामय झाला तीर्थें पुरले तदीय हृत्काम ।
त्या समया पासोनी चंद्रोदय तीर्थ हें वरी नाम ॥ २७ ॥
वाटे जरि क्षयाकृति अद्यापिहि तीर्थ हें सदा स्फुरण ।
चंद्रोदयास पात्रे यत्सेवन रोगभय करी हरण ॥ २८ ॥
कामप्रपूरणाऽभिध नीलप्रभ तीर्थ उत्तरेस असे ।
श्री चंद्रनाथ नगिंचा वाटे तो इंद्रनीलमणिच असें ॥ २९ ॥
पुरवी इच्छित ह्मणुनी कामद ऐसेंहि त्यास जन वदती ।
करि जी याचें सेवन पतिसह वरि सर्वकाल हरपद ती ॥ ३० ॥
पूर्वी एक ऋषीची त्या तीर्थीं कन्यका करी वसती ।
गिरिजेस चैत्रमासीं आराधी भक्तिनें प्रति दिवस ती ॥ ३१ ॥
ती भार्यागुणवर्णन आनंदें प्रतिदिनीं करी आर्या ।
ऐशा तद्भक्तीला पाहुनि झाली प्रसन्न हरभार्या ॥ ३२ ॥
जी दुर्गार्पण निजमन भक्तिसुरस पूर्ण स्वच्छतर पात्र–।
करि, त्या मुनिकन्येला गिरिजावर शिवपदा करीपात्र । ३३ ।
तीर्थाऽधिष्ठानें ती पात्र जहाली तपोवरफळाला ।
तन्मज्जन ज्या घडलें समजा त्याचा मनोरथ फळाला ॥ ३४ ॥
ज्याचा महिमा दावी दुरितमतंगजगणास भय हरिसा ।
तत्प्रभवेंउद्धरली शर्मिष्ठा रम्य चरित तें परिसा ॥ ३५ ॥

---

१ अति शीतल किरण. २ निळ्या वर्णाचें. ३ श्रीसावाचें स्थान ( कलस. ) ४ श्री पार्वतीच्या गुणाचें वर्णन. ५ श्रेष्ठा. ( श्रेष्ठ असी जी ) ६ भक्तिरूपी सुरसानें पूर्ण (भरलेलें) अति स्वच्छ पात्र ( भांडें ) ७ पार्वतीनें प्रसन्न होऊन दिलेला वर. ८ तपाच्या श्रेष्ठ फळास. ९ त्या तीर्थाचें स्नान.

ऋषिवर्य और्व पूर्वी मुनिवृंदासह सुखें धरी विपिन ।
तोकां माय तसा तो बोधरसें छात्रगण करी पीन ॥ ३६ ॥
भोंदाया त्यां मुनिला शर्मिष्ठा अप्सरोत्तमा आली ।
यद्दर्शनार्थ करिलचि स्मरकरपाशस्थ मुक्त निज आली[1] ॥ ३७ ॥
भुलवी मुनिंस तियेचें अद्भुत तारुण्य रूप मंदगती ।
जैसा दीप पतंगा अथवा केतकसुगंध भृंगतती ॥ ३८ ॥
शिवशिव दुर्मतिपटलीं मुनिजनसद्सद्विचाररवि दडला ।
किंबहुना शर्मिष्ठा-दर्शनराहूस तो वळीं पडला ॥ ३९ ॥
सर्वांचें मन गेलें तिजवरि निंद्य प्रकारही घडला ।
पुण्याश्रमास नेणो कवणाचा दृष्टि दोष हो जडला ॥ ४० ॥
येइल का अवला ही कवणाचें तरिहि पाठवल नसतां ।
तरि हा कोण परहिताऽ-सहिष्णु[2] जो मत्सरीं असा वसता ॥ ४१ ॥
होतो तर्क असा कीं याचा संबंध जाय जिष्णुकडे[3] ।
जो मेनकाऽऽख्यपविहत करि गाधिज सत्तपोद्रिचेहि कडे ॥ ४२ ॥
साजेना हें कवणा मन्द जनासम कुतर्क हे घेणें ।
भलतीच कोटि लढउनि दुसऱ्याला दोष व्यर्थ कां देणें ॥ ४३ ॥
कोणे एका अनुहित कृत्या दिधला ह्मणोनियां थारा ।
अवघ्या दुःष्कृत्यांतहि त्या अपराध्यास काय हो सारा ॥ ४४ ॥
समजा निजकार्यास्तव तिजला सुरपालकेंचि पाठविलें ।
सोडा कर्तव्या हें मुनिला त्यानेंच काय सांगितलें ॥ ४५ ॥
अज्ञतम प्रिय होतां त्यांहीं सुज्ञानदीप मालविला ।
शठ काम मित्र हितकर मानूनि तपःसुमित्र घालविला ॥ ४६ ॥

---

१ सखी. २ परहित+असहिष्णु ( दुसऱ्याचें बरें सहन होत नाहीं असा ). ३ इंद्र. मेनका नामक वज्रानें पाडिलेले. ( मेनकारूपी वज्रानें पाडिलेले असा भाव. ) ५ अज्ञानरूपी अंधार.

जी रम्यरूपधर तत्सुतपोनाशार्थ[1] पातली वीज ।
ती चंद्रिकाच[2] मानिति हें त्यांच्या तिव्र बुद्धिचें चीज ॥ ४७ ॥
राहो ती गोष्ट नको वादप्रतिवाद कासया व्यर्थ ।
न्हायाचें कधिं न चुके घेऊं इतुकाच या स्थळीं अर्थ ॥ ४८ ॥
समजे और्व मुनिवरा सर्वहि तें जाहला सुबहु खिन्न ।
वाटे होय तयाचें मानस अशुभप्रकारशरभिन्न ॥ ४९ ॥
निजवृंद मोहपाशीं करि वश तिस पाहुनी समुद्र जसा ।
वर्षाकाळीं खवळे हा क्रोधाविष्टविप्रवर्य तसा ॥ ५० ॥
बोले तिजला दुष्टे कां तूं मम आश्रमास आलीस ।
तव हृदयीं पाप तसें नाहीं गे गरल उग्र व्यालीस[3] ॥ ५१ ॥
दिधली कोणी आतां एकाकी येथ यावया तुजला ।
सुविचारयुक्त सज्जन-मन तैसा जो धरासुरीं सजला ॥ ५२ ॥
उन्मत्त वागविशी ज्याचा भारी मनांत तूं गर्व ।
सज्जनसुतपोनाशक नासो सौंदर्य तें तुझें सर्व ॥ ५३ ॥
कोपाविष्ट ऋषीश्वर देता झाला असा तिला शाप ।
वाटे फळे तिनें जें पुण्यक्षेत्रांत रोपिलें पाप ॥ ५४ ॥
शिष्यांच्या दुर्मतिचें ज्याचा सद्बोधवायु पटल हरी ।
तो कोपसिंधु वाटे उसळति शापोक्ति त्यांत त्या लहरी ॥ ५५ ॥
कीं मुनिवर कोपानल त्याची शापोक्ति तीव्रतर आहे ।
जणु ती शर्मिष्ठेच्या सौंदर्यगृहास झोंवली[4] आहे ॥ ५६ ॥
अथवा तिजवर पडती जे करिती रूप शांतिचें हरण ।
क्रोधानलतप्तरुधिर-वाष्पोद्भुतयंत्रमुक्त[5] अग्निकण ॥ ५७ ॥

---

१ त्यांच्या उत्तम तपाच्या नाशास्तव. २ चांदणें. ३ सर्पीणीस. ४ ज्वाला. ५ क्रोध+अनल+तप्त+रुधिर+बाष्प+अद्भुत+यंत्र+मुक्त=( क्रोधरूपी अग्नीनें तापलेल्या, रक्ताच्या वाफेचे अद्भुत यंत्र ( इंजन. ) यांतून सुटलेले. )

तद्दिव्यदेह होतां चित्राऽऽमयमय[1] मुनींद्र शापानें ।
झाली कृताऽपराधें दुःखित व्हावें जसें गरलेपानें[2] ॥ ५८ ॥
स्वर्लोकवर्ज्य झाली स्थित्यंतर लाजवी तिलाफार ।
वाटे तिलाचि भूला अतिदुःखद होय आपुला भार । ५९ ॥
प्रियतरसर्वांहुनि जो नच शंकलि त्याहि तुच्छ लेखाया ।
हिंडे गहनांत ह्मणे व्याघ्रादिक हो सुखें मला खा या ॥ ६० ॥
दैवप्रभवें पावे कामद तीर्थास चंद्रनाथ नगीं ।
तेथें वसे ह्मणे नच होमत्सम निंद्यकाय अन्य जगीं ॥ ६१ ॥
अबला दुर्दैवाच्या तरुशीं मुनिकोप चंडतरु घांसे ।
अपराधवायुवेगें पेटे शापाग्नि त्यामुळें भासे ॥ ६२ ॥
भडके सौंदर्यवनीं शर्मिष्ठेच्या क्षणांत जो सर्व ।
तीर्थोदक मेघाच्या वर्षावें नष्ट होय तद्गर्व[3] ॥ ६३ ॥
सेवन त्या तीर्थाचें घडतां तद्रोग हळुहळू दमला ।
जाणो त्या उदकाच्या सेकें मुनिशापवन्हि तो शमला ॥ ६४ ॥
पाहे एका समयीं शर्मिष्ठा तेथ एक सिद्धवर ।
जाणो तो करुणाकर चंद्रेश्वर वरद सिद्धरूपधर ॥ ६५ ॥
त्या श्रेष्ठा स्वास्थिचें सर्व कथी वृत्त नमुनि तच्चरण ।
वाटे ती करिताहे प्रायःश्चित्तीं स्वदोष-उच्चरण[4] ॥ ६६ ॥
और्वमुनीच्या शापें वपु माझें चित्र रोगमय झालें ।
सिद्धवरा त्या दुःखें विपिनें हिंडत नगासि या आल्यें ॥ ६७ ॥
येथें दशाब्द येउनि झाले ठाउक नसे दुजें स्थान ।
कंदफलाशन करित्यें पानहि तीर्थींच या सदा स्नान ॥ ६८ ॥
भेषजें[5] नाहीं केलें भजलें देवास ही न मीं कोठें ।

---

१ चित्ररोगानें व्याप्त. २ वीष पिणाऱ्यानें. ३ याचा ( शापाग्नीचा ) गर्व. ४ आपल्या दोषांचा ( पातकांचा ) स्पष्ट उच्चार. ५ औषध.

परि पूर्वस्थिति पाहतें आश्चर्यचि हें गमे मला मोठें ॥ ६९ ॥
सिद्ध ह्मणे कां करिशी ऐसें आश्चर्य, दैव तव मोठें ।
ह्मणुनीच प्राप्त झालिस या स्थाना नच गमो तुला खोटें ॥ ७० ॥
दुष्प्राप्य सुरांसहि जें सेवन त्याचें दशाब्द तुज घडलें ।
त्यायोगेंचि तुझ्या हें पूर्वस्थितिसौख्य दृष्टिला पडलें ॥ ७१ ॥
माहात्म्य असें तिजला सांगे तों ये नभांतुनी यान ।
बसुनीं स्वर्गीं गेली त्यांत, करित तीर्थ सद्यशोगान ॥ ७२ ॥
उद्धरली त्या तीर्थीं होउनियां पापमुक्त शर्मिष्ठा ।
यास्तव शर्मिष्ठहि त्या ह्मणती हें दे जनां फला इष्टा[1] ॥ ७३ ॥
कुष्टादि रोगनाशन तीर्थ ह्मणुनि त्यास हात नासत्य[2] ।
जोडिति प्राप्त्यर्थ सदा मानिति ही कीर्ति सुज्ञ जन सत्य । ७४ ॥

---

## अध्याय ७ वा.

---

श्री चंद्रेश पदोद्भव-सर्वोत्तम तीर्थ मूलगंगा[3] जे ।
सेविति धन्यतमचि ते यश ज्याचें त्रिभुवनीं सदा गाजे ॥ १ ॥
ज्या तीर्थाचें सेवन तुष्ट करितसे सदा सुरर्षिंसदा[4] ।
अरुणोदयास घडतां त्या तीर्थीं स्नान, होय सौख्य सदा ॥ २ ॥
दुःसाध्य भिषग्वर्यां जे गद हरतात याचिया स्नाना-।
करितां श्रद्धापूर्वक, राहुनियां एक मास या स्थाना ॥ ३ ॥
या तीर्थीं स्नानत्रय करितां वंध्याहि होय पुत्रवती ।
अंतीं स्नानप्रभवें शिवसदना पात्र होय पुत्र वती ॥ ४ ॥
निर्धन जनास घडतां मज्जन बनती दुजे कुबेरचि ते ।

---

१ इच्छित अशा. २ अश्विनी कुमार ३ तीर्थविशेष. ४ देव, ऋषी यांच्या समाजा.

घडतां विप्रां होती ज्ञानसदन शिष्यजनमनीं रचिते ॥ ५ ॥
क्षत्रिय छत्रपतीच्या स्नानें पदवीस निश्चयें वरिती ।
वैश्यां शूद्रां भवनद उतराया स्नान होतसे तरि ती ॥ ६ ॥
पूर्वी शकुंतला सति सेवुनि हें तीर्थ नित्य सद्भावें ।
प्रसवे पुत्र असा कीं ज्या मानुनि विधु, चकोरकीं[१] धावें ॥ ७ ॥
नाम तया शांकुंतल झाला हा चक्रवर्ति पद वरिता ।
तेजें रिपुजनमनिंचा गर्वाचा घट करी सदैव रिता ॥ ८ ॥
या तीर्थी स्नानातें करुनि, सुरगण स्मरोनिया भावें ।
श्री चंद्रेश्वरदर्शन भवनद उतरावया जनीं घ्यावें ॥ ९ ॥
मृगविहगाऽधिष्ठित तें स्थल सुखवी दर्शनेंचि चित्ताला ।
वाटे त्या लोभी ही पाहतां वर्जील खास वित्ताला ॥ १० ॥
प्रतिमास पूर्णिमेला या तीर्थी स्नान करुनि शिवभजना ।
करितां वरदेश्वर हर वरदानें तोषवील सत्य जना ॥ ११ ॥
व्यर्थ अकारण भाषण नचकरितां, स्नानविधिस या तीर्थी ।
उरकोनी शिवपूजन करितां कल्याण होय सर्वार्थी ॥ १२ ॥
स्वर्गांत पितर इच्छिति या तीर्थाचें सदैवही तोय ।
येथें तिलांजलीला देतां अक्षय्य तृप्ति त्यां होय ॥ १३ ॥
ज्याच्या स्मरणें क्लेशद कलिभव दुरितें कदापि नच जगती ।
चंद्रेशांशैनीला[२] आहे हें घ्यावया जनास गती ॥ १४ ॥
भवभयहर चंद्रेश्वर–पादकमलयुगज तीर्थ हें सिद्धं[३] ।
ताराया जन तैसें आहे दुसरेंहि नाम त्या सिद्धं[४] ॥ १५ ॥
लोहाकांचनता दे परिस, तसें सिद्ध तीर्थ पाण्याला ।
करि दिव्य बिंदु ज्याचा अमृताचा लाजवी सदा प्याला ॥ १६ ॥

---

१ चकोर पक्षांनीं. २ श्रीचंद्रेश्वराच्या ऐशान्य दिशेकडील भागास. ३ तयार. ४ तीर्थ विशेष.

दर्शन होय जयाचें विघ्नमशकसंघवारणा चंवरी ।
घडतां त्याचें सेवन जन इच्छितकार्यसिद्धिलाभ वरी ॥ १७ ॥
भाविक जनास देउनि धीर ह्मणे जें भवाऽब्धिभय सोडा ।
विष्णुप्रियलाभाला संपादायास यास कर जोडा ॥ १८ ॥

## अध्याय ८ वा.

श्री सांबासम त्याचें नाम असे श्रेष्ठ या जनांत सदा ।
तैसें यशहि तयाचें जेणें बहु होय हर्ष साधु-सदा ॥ १ ॥
दाता शिवसदनाचा शिवयश वा नाम होय दीन जना ।
जें पतितांला लावी श्री गिरिजावर मनोरमा भजना ॥ २
गंगाधर हृत्तोषद विष्णु सदा होय त्याचि यशगानें ।
सुखवी शिवयश सर्वां ज्या लाजावें सदा सुराऽगानें ॥ ३
यास्तव जनहो स्तवना सुस्वर सांबाचिया करा गाने ।
कीं ये त्याणेचि नरां, भूषण तैसें न हेम–सु नगानें ॥ ४
वर्णी पुढें षडानन तीर्थाच्या रम्य ज्या चरित्रास ।
परिसा श्रद्धेनें जें भक्तजनाचे सदा हरी त्रास ॥ ५ ॥
झाले वेदपरायण ज्या तीर्थी मुदित पुण्यगतिलाभें ।
ज्या सुगतिद तीर्थाचा महिमा दे सतत काळमतिला भें ॥ ६ ॥
तन्नाम मालती हें नग पश्चिमभाग शोभवीत असे ।
यत्सेवनीं सुखदगुण तैसा पीयूष सेवनींहि नसे ॥ ७ ॥
भक्तिपुरःसर करि जो या तीर्थी स्नान तद्दुरित सर्व ।
पावे विलया पाहे कैलासीं दीन कल्पतरु शर्व ॥ ८ ॥

---

१ कल्पवृक्षानें २ अमृत.

स्कंद ह्मणे ऋषिजन हो ऐका चंद्रेश दर्शनादि विधी ।
धन्य तयाचेंच जनन नित्य घडे ज्या नरास हें सविधी ॥ ९ ॥
श्री चंद्रेश्वर दर्शन–कामीं शिखरासि पाहुनी नमन ।
भावें करोनि सांवा अवलोकाया नगीं किजे गमन ॥ १० ॥
निजजन कल्पद्रुमहर–दर्शन घेऊनि तत्पदीं लीन ।
होऊनि सोमसूत्री करिजे भावें प्रदक्षिणा तीन ॥ ११ ॥
अथवा कुशावतीच्या तीर्थीं पूर्वीं करोनियां स्नान ।
जावें चंद्रेश नगीं नच देतां भाषणा मुखीं स्थान ॥ १२ ॥
वा स्नान सिद्ध कुंडीं करुनीं चंद्रेशदर्शना जावें ।
दर्शनविधि पुर्वोक्तचि करुनी शितिकंठलाभसुख घ्यावें ॥ १३ ॥
ऐसा विधि उरकोनी पंच[1]क्रोशी करोनियां भावें ।
तिर्थादि स्थानांतें वंदुनि चंद्रेश्वरीं पुनः यावें ॥ १४ ॥
ऐसें श्रीचंद्रेश्वर– दर्शन विधियुक्त ज्या नरास घडे ।
होय कुलोद्धारक तो कीं ज्याला पाहतांच पाप दडे ॥ १५ ॥
मुनिसंघ तृप्त झाला श्रीचंद्रेश्वरसुकीर्तिरसपानें ।
वाटे त्यां लाजावें अति संतुष्टेंहि दिव्य र[2]सपानें ॥ १६ ॥
देवा ज्यांच्या स्मरणें हर्ष बहुत होय सर्व साधुजना ।
त्या तव पदकमलांच्या लागो हा दीनजन सदा भजना ॥ १७ ॥
संसृतिवातावरणीं गेलें मम मन विमान बहु दूर ।
आटोपेल कसें हें भरला बहु विषयवासना धूर ॥ १८ ॥
व्यसन[3]नगीं पाडिल वा बुडविल दुःखार्णवांत कीं कोठें ।
टाकील हें कळेना देवा भय हेंच लागलें मोठें ॥ १९ ॥
सर्वेश्वरा दयाळा करिं या दीनास तवपदीं जतन ।

---

१ श्री चंद्रेश्वर पर्वताच्या पायथ्याशीं जें श्रीभैरव देवाचें देऊळ आहे, तेथून पर्वतास जी प्रदक्षणा घालतात, तीच पंचक्रोशी असावी. २ अमृत प्राशन करणारानें. ३ संकटरूपी पर्वतावर.

प्रारब्धभोग दुर्धर यातें घडणार निश्चयें पतन ॥ २० ॥
शक्य न तुज काय असे देवा सामर्थ्य तव जनीं व्यक्त ।
करि विश्वाची रचना नच हो हा दास तव कृपांत्यक्त[1] ॥ २१ ॥
ह्मणशी ऐशा समयीं आठवला देव शब्द तुज का
स्मराति न सौख्यानुभवीं परि दुखतां ह्मणाति सर्व अग आई ॥ २२
वाटे तव यश गावें तों मन अन्यत्र जाय हें देवा ।
वारा तच्चंचलता घ्या मजकडुनी सदैव पदसेवा ॥ २३ ॥
कर्ता प्रयोजक[2] हि तूं अखिलाचा विश्वहेतु[3] तव कृत्य ।
आहे मदीय कृति ही नाहीं कीं बोलण्यांत या तथ्य ॥ २४
सांवा तव दृग्ज्वलनीं[4] होय भस्मित[5] अति विशाल दोषवन ।
यास्तव तव पदकमलीं अर्पितसे हें सदोष जरि कवन ॥ २५
दे मज तवयश गाया अभिरुचि चंद्रेश्वरा दयासिंधो ।
ऐसें अनन्यभावें मागे तुज विष्णु दीनजनबंधो ॥ २६ ॥
अज्ञतमोर्क[6] सदा जी शांतादुर्गा मदीय कुळदेवी ।
तत्संज्ञकं[7] मत्पूर्वज नाम करुनि सांतु[8] हें तिला सेवी ॥ २७
रंगाजी नारायण गणबा, यांचें अनुक्रमें नातें ।
सुतपौत्र पणतु[9] होतें तो पूर्वज सतत योग्य नमनातें ॥ २८
नारायणीं[10] तसें तें गणबा रंगाजि सांतुचें पावे ।
वरि अंत्य[11] विष्णु हें नव नाम ह्मणे पूर्वजांसि सेवावें ॥ २९ ॥

१ तुझ्या कृपेनें सोडलेला २ करविता. ३ जगाला कारण. ४ तुझ्या दृष्टिरूपी अग्नींत. ५ भस्म. ६ अज्ञानरूपी अंधाराचा सूर्य. ७ तिच्या संज्ञेचें ( श्री शांतादुर्गा कुलदेवीचें. ) हें विशेषण नाम या शब्दाचें. ८ सांतु हें कर्त्याच्या पूर्वजांचें नाम. ९ रंगाजी, नारायण, गणबा, यांचें सुतपौत्र पणतु हें नातें पूर्वजांकडे ( सांतु याकडे ) ह्मणजे सांतु याचा पुत्र रंगाजी त्याचा नारायण आणि नारायणाचा गणबा हें होय. १० नारायण जो ( रंगाजीचा पुत्र व सांतूचा नातू ) त्याशीं गणबा, रंगाजी सांतु यांचें पूर्ववत नातें, ह्मणजे नारायणाचा पुत्र गणबा त्याचा रंगाजी आणि रंगाजीचा सांतु ( हें कर्त्याचें पहिलें नांव ) हें होय. ११ वर्णीत इसमांपैकीं शेवटला जो सांतु त्याचें दुसरें नांव विष्णु हें होय.

म्यां कोड मनीं धरिलें श्री चंद्रेश्वरमहत्व गायाचें ।
सिद्धिस गणेश जोशी–कृत टीका करि सहाय्य बहु याचे ॥ ३० ॥


[illegible] चंद्रेश्वर–चरणीं ईप्सित[1] समर्पितां भावें ।
[illegible] दिनानें याचियलें तें सुखेंचि लाभावें ॥ ३१ ॥

सत्काव्यरसज्ञानो मत्कृतिदोषक्षमा उदार मनें ।
करणार ही दृढाशा बाळगुनी या विनम्र अज्ञ जनें–॥ ३२ ॥

सादर तुम्हा पुढें ती केलीसे अल्पकृति करा मान्य ।
प्रियतर सुमनाऽऽभावीं जैसा हर अर्क[2]पुष्प सामान्य[3] ॥ ३३ ॥

**समाप्त**

१ इच्छित. २ रुईचें फूल. ३ साधारण.



# विक्रीस तयार.

श्री मंगेश-शांताभजनामृत किं. ८=॥; आरत्या संग्रह किमत ८॥ आणा.

हीं पुस्तकें कर्त्याकडे खालील पत्त्यावर विकत मिळतील

नारायण शाबा पाणंदीकर
हेडक्लार्क, मुंबई-आर्सेनल.

## संगीत श्रीमंगेश--शांताचरित्र किं. ८=

हें, व दुसरीं सर्व प्रकारचीं शाळोपयोगी पुस्तकें, नाटकें, कादंबऱ्या, स्तोत्रें वगैरे खालील पत्त्यावर मागवा. व्यापाऱ्यांस भरपुर कमीशन मिळेल.

वागळे आणि सन्स.
बुकसेलर्स, प्रिंटर्स आणि पब्लीशर्स.
घर नं. २९ वनामहॉल क्रॉसलेन, गिरगांव-मुंबई.

## श्री देवि चरितामृत.

ह्या पुस्तकास खर्चापुरते आगाऊ सह्या देणारे आश्रयदाते मिळतांच पुस्तक वर्गणीदारांचे हातीं येईल. देवी भक्तांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव व पत्ता पाठविण्याची त्वरा करावी. पुस्तकाची किमत सहा आणे.

मंगेश भिकूभट गायतोंडे-कवळें-फोंडा-गोवा.

( वि० रं० शेळडेकर. )